ILO/Japan
Multi-bilateral
Programme

International
Labour
Organization

# महाराष्ट्रातील अनौपचारिक कामगारांसाठी असलेल्या सामाजिक सुरक्षा योजनांची मार्गदर्शक पुस्तिका

*केन्द्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या अनौपचारिक कामगारांसाठी असलेल्या सामाजिक सुरक्षा योजनांची मार्गदर्शक पुस्तिका*

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (आय एल ओ), नवी दिल्ली

आणि

प्रकल्प ‘अनौपचारिकतेतून बाहेर पडण्याचा मार्ग’
२०१२-२०१७

प्रकाशन हक्क © आंतरराष्ट्रीय कामगार संघटना २०११
प्रथम प्रकाशित (२०१७)

आंतरराष्ट्रीय श्रम  कार्यालयाची प्रकाशने, जागतिक प्रकाशन अधिवेशनाच्या, प्रोटोकॉल २ अंतर्गत छापण्यात येतात. तथापि,  स्रोताबाबत माहिती देण्याच्या अटीवर, यातील  काही छोटे उतारे अधिकृत मान्यतेशिवाय पुनर्मुद्रित करता येऊ शकतात.  भाषांतराच्या पुनर्मुद्रण हक्क प्राप्त करण्याकरिता, आय एल ओ प्रकाशने (हक्क आणि परवानगी), आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालय, सी एच-१२११, जीनिव्हा २२, स्वित्झर्लंड येथे अर्ज करावा. अथवा, pubdroit@ilo.org  येथे  ई-मेल करावा. अशा अर्जांचे आंतरराष्ट्रीय कामगार कार्यालय नेहमी स्वागतच करते.

ज्या ग्रंथालयांनी अथवा संस्थांनी, युनायटेड किंग्डम मधील कॉपीराईट लायसन्सिंग एजन्सी, ९० टॉटेनहॅम कोर्ट रोड, लंडन डब्ल्यू १टी, ४एल पी (फॅक्स : (+४४)(०)२० ७६३१ ५५००, ई मेल : cla@cla.co.uk ), अथवा युनायटेड स्टेटस् येथील कॉपीराईट क्लियरन्स सेंटर, २२२ रोझवुड ड्राईव्ह, डेन्व्हर, एम ए ०१९२३ (फॅक्स : (+१) (९७८) ७५० ४४७०; ईमेल : info@copyright.com)  अथवा अन्य देशातील पुनर्मुद्रण हक्क संघटनांमधे नोंदणी केली आहे, ते, त्यांना याकरिता जारी करण्यात आलेल्या परवान्यानुसार नक्कलप्रत तयार करू शकतात.

---

आय एल ओ
महाराष्ट्रातील अनियमित कामगारांकरिता असणाऱ्या सामाजिक सुरक्षा योजनांची मार्गदर्शक पुस्तिका

नवी दिल्ली, आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालय, २०१७-०५-१७

आय एस बी एन : ९७८-९२-२-८३१३१६-१ (मुद्रण)
९७८-९२-२-८३१३१७-८ (वेब पीडीएफ)

---

आय एल ओच्या प्रकाशनातील पदनियुक्त, जे संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यपद्धतीशी सुसंगत आहेत,  तसेच सादर करण्यात आलेले मजकूर सादरीकरण, आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालयाच्या कोणत्याही देशाच्या, क्षेत्राच्या किंवा प्रदेशाच्या कायदेशीर स्थितीबद्दल, अथवा त्यांचे अधिकार, अथवा त्यांच्या सरहद्दीच्या परिसीमांबाबत कोणतेही मतप्रदर्शन सूचित करत नाहीत.
मुद्रित लेख, अभ्यासलेख तसेच अन्य साहित्यातून मांडण्यात आलेल्या मतांसाठी केवळ लेखक जबाबदार आहे. तसेच त्या लेखातील मजकूरांना आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची मान्यता देण्यात आलेली नाही.
कंपन्यांची नावे तसेच व्यावसायिक उत्पादने तसेच प्रक्रिया यांना आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालयाकडून मान्यता आहे असे सूचित होत नाही, त्याचप्रमाणे एका विशिष्ट कंपनीचा, व्यावसायिक उत्पादनाचा तसेच प्रक्रियेचा उल्लेख करण्यात आला नसल्यास त्याला मान्यता नाही असेही सूचीत होत नाही.
स्थानिक प्रादेशिक कार्यालयाची माहिती मिळवण्यासाठी खालील परिच्छेद आणि संकेतस्थळ संदर्भांमधे बदल करता येऊ शकतात.
आय एल ओ ची प्रकाशने, प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे अथवा अनेक देशांतील आय एल ओ स्थानिक कार्यालयात उपलब्ध आहेत, अथवा, आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालय, सी एच-१२११, जीनिव्हा २२, स्वित्झर्लंड इथून थेट मागवू शकतात. प्रकाशनांची सूची अथवा नवीन प्रकाशनांची यादी वरील पत्त्यावर विनामूल्य उपलब्ध आहे. किंवा pubvente@ilo.org  येथे ईमेल करून मागवू शकता किंवा www.ilo.org/publns या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

भारतात मुद्रण करण्यात आले.

## प्रस्तावना

या मार्गदर्शक पुस्तिकेत महाराष्ट्र राज्यातील अनियमित कामगारांसाठी, केन्द्र तसेच राज्य सरकारतर्फे राबवण्यात येणाऱ्या सामाजिक कल्याण तसेच सामाजिक सुरक्षा योजनांसंबधी माहिती देण्यात आली आहे. या योजनांसाठी, दारिद्र्य रेषेखालील, अर्धशिक्षित अथवा अशिक्षित तसेच असुरक्षित गटातील व्यक्ती जसे महिला, ज्येष्ट नागरिक, दिव्यांग व्यक्ती, स्थलांतरित तसेच वंचित घटक अशा विविध गटांना डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे.

१९७० सालापासून, आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेचा, अनौपचारिक अर्थव्यवस्था हा सखोल अभ्यासाचा आणि विश्लेषणाचा विषय राहिला आहे. जरी तेव्हा, अनौपचारिकता ही तात्पुरती घटना असून, जसजशी देश आर्थिक प्रगती साधेल तसतशी ती कमी होईल असे मानण्यात येत होते. तथापि अनेक देशांनी आर्थिक प्रगती आणि विकास साधूनही प्रत्यक्षात कामगार जगतामधे अजूनही अनौपचारिक अर्थव्यवस्थेचा प्रभाव दिसून येत आहे. अनौपचारिक अर्थव्यवस्थेतील कामगार सहसा मान्यताप्राप्त नसतात, त्यांची कुठे नोंद नसते, ते असंघटित असतात तसेच बहुसंख्य वेळा सामाजिक सुरक्षा, कामगार कायदा तसेच कार्यक्षेत्रातील सुरक्षा उपायांच्या परिघाबाहेर असतात. अशा कामगारांना, सरकारी योजनांअंतर्गत मिळणाऱ्या आपल्या हक्कांची जाणीव नसते.

सर्वांसाठी सुयोग्य रोजगार हे उद्दिष्ट गाठताना अनौपचारिक अर्थव्यवस्था हा मोठा अडथळा ठरतो.  दक्षिण आशियाई देशांमधे, अनौपचारिक अर्थव्यवस्थेतील समस्या हाताळणे तसेच सुयोग्य काम देण्यावर भर देणे याला विशेष महत्त्व आहे, कारण, दक्षिण आशिया क्षेत्रामधील देशांमधे अनौपचारिक अर्थव्यवस्थेचा उच्चांकी म्हणजे जवळपास ८२ टक्के इतका दर असून तो बिगर-शेती उद्योगांमधे प्रामुख्याने आहे. अनौपचारिक अर्थव्यवस्थतील समस्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच अनौपचारिकतेतून औपचारिक अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रमणा करताना येणाऱ्या अडथळ्यांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या नवी दिल्ली कार्यालयामार्फत, 'अनौपचारिकतेतून बाहेर पडण्याचा मार्ग' हा प्रकल्प राबवला गेला. अनौपचारिक अर्थव्यवस्थेतून औपचारिक अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रमणा होण्यासाठी दक्षिण आशियातील बांग्लादेश, भारत आणि नेपाळ या देशांमधे २०१२ ते २०१६ या काळात हा प्रकल्प राबवण्यात आला. या प्रकल्पाला जपान सरकारचे आर्थिक सहाय्य प्राप्त झाले होते. हा संदर्भ घेता, ही मार्गदर्शकपुस्तिका, जाणीव जागृत करणारे साधन म्हणून तयार करण्यात आली आहे.

जरी सरकारने विविध गटांना उपलक्ष्यून केलेल्या अनेक योजना तयार केल्या असल्या, तरिही अभिप्रेत लाभार्थींना त्या योजनांद्वारे मिळणाऱ्या हक्कांची पुरेशी जाणीव असतेच असे नाही. काही वेळेस, जाणीव असली तरी त्या कशा मिळवायची, त्याची पद्धती काय आहे, पात्रता मानके, लागणारे दस्तऐवज याबाबतच्या माहितीची उणीव असते. अशा योजनांसंबंधी माहिती मिळण्याकरता, अनौपचारिक कामागारांसाठी, ही मार्गदर्शक पुस्तिका खूपच उपयोगी साधन आहे.

औपचारिकता म्हणजे केवळ आर्थिक समावेशन नव्हे, तर, कामगारांना आपल्या मूलभूत हक्कांची जाणीव होणेदेखील आहे. यात त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या योजनांद्वारे मिळणरे हक्क तसेच त्यांना बहाल करण्यात आलेली प्रतिष्ठा यांचाही समावेश होतो.

## अनुक्रमणिका


'महाराष्ट्रातील सामाजिक कल्याण योजना मार्गदर्शिका' पुस्तकाची तोंडओळख ........ १

मार्गदर्शिका संकलित करण्याकरिता वापरण्यात आलेली पद्धती ........ ३

सामाजिक कल्याण योजना

अ. अन्न सुरक्षा आणि पोषण योजना

शिधापत्रिकांचे विविध प्रकार ........ ४
१. दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिका (पिवळे) ........ ५
२. दारिद्र्यरेषेवरील शिधापत्रिका (केशरी) ........ ७
३. अंत्योदय अन्न योजना ........ ८
४. अन्नपूर्णा ........ १०
५. एकात्मिक बालविकास सेवा (आय सी डी एस) दुहेरी पोषण ........ १२

ब. निवृत्तीवेतन आणि सामाजिक सुरक्षा योजना सामाजिक
६. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना ........ १४
७. संजय गांधी निराधार अनुदान योजना ........ १५
८. इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांगत्व निवृत्तीवेतन योजना अथवा इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंगत्व निवृत्तीवेतन योजना ........ १६
९. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना ........ १७
१०. राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना ........ १८
११. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था योजना ........ १९
१२. आम आदमी विमा योजना ........ २०
१३. इंदिरा गांधी निराधार भूमीहीन शेतमजूर महिला अनुदान योजना ........ २१
१४. प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना ........ २२
१५. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ........ २३
१६. कर्मचारी राज्य सुरक्षा विमा योजना ........ २४

क. प्रसूतीलाभ समावेशक आरोग्य योजना

१७. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना ........ २५
१८. जननी सुरक्षा योजना आणि सुखीभव/सुखीबहू ........ २६
१९. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना ........ २७

ड. गृहनिर्माण आणि रोजगार योजना

२०. इंदिरा आवास योजना ........ २९
२१. राजीव आवास योजना, राजीव ऋण योजना ........ ३१
२२. विडी कामगारांना गृहनिर्माण अनुदान योजना ........ ३२
२३. संजय गांधी स्वावलंबन योजना ........ ३४
२४. स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना ........ ३५
२५. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ........ ३७
२६. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) ........ ३८

इ. शेतकऱ्यांशी संबंधित योजना आणि अन्य योजना

२७. कृषी संजीवनी योजना ........................................ ३९
२८. गोपिनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना ........................................ ४०
२९. पंतप्रधान पीक विमा योजना ........................................ ४१
३०. पंतप्रधान जनधन योजना ........................................ ४२

स्त्रोत ........................................ ४३

## ‘महाराष्ट्रातील सामाजिक कल्याण योजना मार्गदर्शिका’ पुस्तकाची तोंडओळख

भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनातर्फे दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या, कमी उत्पन्न गटाच्या जनतेच्या तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक, बेरोजगार, स्थलांतरित, भूमीहीन, तरूण वर्ग, शेतकरी, असंघटित क्षेत्रातील नागरिक तसेच वंचित घटकातील लोकांच्या कल्याणार्थ अनेक योजना राबविल्या जातात. या योजना प्रामुख्याने निरक्षर अथवा अल्पशिक्षित वर्गाच्या हितासाठी असतात. शिक्षणाच्या कमतरतेमुळे अथवा निरक्षरपणामुळे, बऱ्याचवेळा लाभार्थी, आपल्या हितासाठी असणाऱ्या योजनांबाबत अनभिज्ञ असतात. आणि अगदी जरी योजनांबद्दल माहिती असली, तरीही त्या योजनांचा लाभ कसा घ्यावा याची त्यांना काहीच माहिती नसते.

त्यामुळेच, असंघटित क्षेत्रातील कामगार आणि त्यांचे कुटुंब यांना डोळ्यासमोर ठेवून ही मार्गदर्शिका बनविण्यात आली आहे. यामध्ये समाजातील खाली नमूद केलेल्या घटकांचाही समावेश आहे :

- दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती
- अल्पउत्पन्न गटातील व्यक्ती
- महिला
- ज्येष्ठ नागरिक
- बेरोजगार
- स्थलांतरित
- भूमीहीन
- ज्यांना पोषक आहाराची गरज आहे असा तरूणवर्ग
- शेतकरी .. आणि
- वंचित घटकातील व्यक्ती

आर्थिक लाभ देणाऱ्या विविध योजनांची तपशीलवार माहिती गरजू लोकांपर्यंत पोहोचवणे हेच या ‘महाराष्ट्रातील सामाजिक कल्याण योजना मार्गदर्शिका’ या पुस्तिकेचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून अभिप्रेत लाभार्थींना त्यांचा योग्य तो लाभ मिळेल. या मार्गदर्शिकेत केन्द्र सरकारने, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने अर्थसहाय्य केलेल्या अशा, दोन्ही प्रकारच्या योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

या मार्गदर्शिकेमुळे, नागरिकांना, विशेषत: अभिप्रेत लाभार्थींना खालील फायदे होतील अशी अपेक्षा आहे :

- अस्तित्वात असणाऱ्या अनेक योजनांबाबत माहिती मिळेल.
- या योजनांसाठी आवश्यक असणारी पात्रता समजेल.
- प्रत्येक योजनेतील, पात्र असणाऱ्यांना नेमके कोणते लाभ मिळू शकतात याबाबत माहिती मिळेल.
- या योजनांसाठी कसा आणि कोणत्या कार्यालयाद्वारा अर्ज करावा याबाबतची माहिती मिळू शकेल.

- योजनांसाठी अर्ज करताना कोणते कागदपत्र सादर करावे लागतात त्याची माहिती मिळू शकेल.

दारिद्र्यरेषेखालील नागरिक, अल्पउत्पन्न गटातील व्यक्ती, महिला, ज्येष्ठ नागरिक, बेरोजगार, स्थलांतरित, भूमीहीन, तरूणवर्ग, शेतकरी, असंघटित क्षेत्रातील व्यक्ती तसेच वंचित घटकातील नागरिक अशा अनेकांना, या योजनांबाबत असणाऱ्या अनेक शंकांचे या मार्गदर्शक पुस्तिकेमुळे निरसन होईल.

## मार्गदर्शिका संकलित करण्याकरिता वापरण्यात आलेली पद्धती

प्रथमत:, विशेषकरून महाराष्ट्र राज्यासाठी ज्या सामाजिक कल्याण योजना राबवल्या गेल्या, त्याबाबतच्या माहितीची ग्रंथालयातून माहिती मिळवून ती तपासण्यात आली. त्याचवेळेला, या योजनांबाबत इंटरनेटवर उपलब्ध असलेली महितीही चाळण्यात आली. योजनांबाबतची आवश्यक ती माहिती मिळवताना, इंटरनेटवर उपलब्ध असलेली माहितीच जास्त उपयुक्त, सर्वंकष तसेच सद्यकालीन आणि अद्ययावत असल्याचे आढळून आले. त्यामुळेच, खास महाराष्ट्रासाठींच्या समाजकल्याण योजनांची माहिती संकलित करण्यासाठी, प्रमुख स्त्रोत म्हणून इंटरनेटचीच निवड करण्यात आली.

सुरुवातीला, 'महाराष्ट्रातील सामाजिक योजना', 'महाराष्ट्रातील समाजकल्याण योजना' हे बीजशब्द वापरून ऑनलाईन चाचपणी करण्यात आली. अशा रीतीने शोध घेताना विविध योजनांबाबतची माहिती हाताशी आली. त्यानंतर सगळ्या योजनांची यादी तयार करून नंतर त्यांचे योग्य ते वर्गीकरण करण्यात आले. अशा तऱ्हेने, या योजनांची खाली दिलेल्या पाच वर्गात विभागणी करण्यात आली.

- अन्नसुरक्षा आणि पोषण योजना
- निवृत्तीवेतन आणि सामाजिक सुरक्षा योजना
- प्रसूतीलाभ समावेशक आरोग्य योजना
- गृहनिर्माण आणि रोजगार योजना
- शेतकऱ्यांशी संबंधित योजना

या वर्गीकरणानुसार योग्य त्या योजनांचा शोध घेण्यासाठी याच वर्गीकरणातील बीजशब्दांचा आधार घेण्यात आला. अशा रितीने मिळवलेल्या माहितीच्या आधारे, प्रत्येक वर्गात मिळत गेलेल्या योजनांची यादी तयार करण्यात आली. अशा पद्धतीने तब्बल ३० ते ३५ योजनांची माहिती सापडली.

एकाच स्त्रोतातून मिळवलेल्या माहितीत, एका विशिष्ट योजनेबाबतची सर्वंकष माहिती मिळू शकत नाही. त्यामुळे अनेक स्त्रोतांचा वापर करून अभ्यास करण्यात आला. ज्ञात झालेल्या योजनेबद्दल अधिक महिती गोळा करण्यासाठी किंवा इतर स्त्रोतांतून मिळालेल्या माहितीतील त्रुटी भरून काढण्यासाठी याच यादीतील विशिष्ट योजनांच्या बीजशब्दांचा वापर करण्यात आला. अशा तऱ्हेने, अनुषंगिक सरकारी विभाग, काही विशिष्ट स्वयंसेवी संस्था तसेच सुविधा पुरवणाऱ्या संस्था त्याचप्रमाणे विकिपिडिया आणि विकासपिडिया

(फक्त विकासासंबंधित माहिती पुरवणारी वेबसाईट) अशा वेबसाईटवर उपलब्ध असेलेली माहिती देखील विचारात घेण्यात आली. ज्या स्त्रोतांचा आधार घेण्यात आला त्याची साद्यंत यादी मार्गदर्शिकेत जोडण्यात आली आहे.

## महाराष्ट्रातील सामाजिक कल्याण योजना

महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या, केन्द्र अथवा राज्मय शासनाने पुरस्कृत केलेल्या सामाजिक कल्याण योजना पुढीलप्रमाणे आहेत :

### अ. अन्न सुरक्षा आणि पोषण योजना

***शिधापत्रिकांचे विविध प्रकार :***

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा गरजूंना लाभ मिळावा या दृष्टीने भारत सरकारने लक्ष्याधारित सार्वजनिक वितरण योजना (टी पी डी एस) सुरू केली. १ जून १९९७ पासून ही योजना अंमलात आणण्यात आली. या योजनेतील व्यवस्थेनुसार, कुटुंबाच्या उत्पन्नानुसार, तीन प्रकारच्या शिधापत्रिका देण्यात येतात. त्याचे निकष आणि वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे :

| अनु क्र. | शिधापत्रिकेचा प्रकार | पात्रतेचे निकष | उपलब्ध जिन्नस |
|---|---|---|---|
| १ | पांढरी शिधापत्रिका | वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांहून अधिक | काहीच लाभ नाहीत |
| २ | केशरी शिधापत्रिका (दारिद्र्यरेषेवरील) | वार्षिक उत्पन्न १५,००० रुपयांहून अधिक | दारिद्र्यरेषेवरील किंमतींच्या दराने गहू, तांदूळ, केरोसीन |
| ३ | पिवळी शिधापत्रिका (दारिद्र्यरेषेखालील) | वार्षिक उत्पन्न १५,००० रुपयांहून कमी | दारिद्र्यरेषेखालील किंमतींच्या दराने गहू, तांदूळ, केरोसीन आणि साखर |

| १. | दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिका (पिवळा रंग) |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | गोरगरिबांच्या अन्नसुरक्षेबाबतीतील समस्या हाताळणे. भारत सरकारने 'दारिद्र्यरेषेखालील' योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत खरोखरच गरीब, अरक्षित गणल्या गेलेल्या समाज घटकांना पिवळ्या रंगाची शिधापत्रिका देण्यात येते. या समाजघटकांमधे उपजिविकेसाठी रोजंदारीवर काम करणाऱ्या, जसे की हमाल, मजूर, लोहार, रिक्षावाहक तसेच हातगाडी वाहक, फळे आणि फूल विक्रेते यांचा समावेश होतो. |
| **केन्द्र की राज्य :** | जिन्नसांची जमवाजमव, त्यांची साठवणूक, वाहतूक तसेच ते उपलब्ध करून देणे ही केन्द्र सरकारची जबाबदारी आहे. तर, हक्कधारकांमधे या जिनसांचे वितरण करणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. |
| **विभाग :** | अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग |
| **लाभ :** | या शिधापत्रिकाधारक कुटुंबांना, प्रतिमाह, ४ रुपये ५० पैसे प्रति किलो दराने ३५ किलो गहू, अथवा ६.०२ रुपये प्रति किलो दराने ३५ किलो तांदूळ खरेदी करण्याचा हक्क मिळतो. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | २०१३-२०१४ या वर्षासाठी एकूण अन्नसुरक्षा अंदाजपत्रक, १,२५,००० कोटी रुपयांचे होते. या योजनेसाठी पात्र असलेल्या सर्वांना या योजनेचा लाभ मिळतो. |
| **पात्रता :** | लाक्ष्यिक सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत खालील निकष लावण्यात येतात :<br>• वार्षिक उत्पन्न १५,००० रुपये असलेली कुटुंब<br>• कुटुंबातील कोणताही सदस्य डॉक्टर किंवा वकील किंवा वास्तुविशारद किंवा सनदी लेखापाल असता कामा नये.<br>• कुटुंबातील कोणीही सदस्य व्यावसायिक कर किंवा विक्री कर किंवा प्राप्तीकर भरणारा नसावा. तसेच असे कर भरण्यासाठी पात्र असता कामा नये.<br>• कुटुंबाच्या मालकीचा निवासी दूरध्वनी असता कामा नये.<br>• कुटुंबाच्या मालकीचे एकही चारचाकी वाहक असता कामा नये.<br>• कुटुंबातील कोणाही सदस्याच्या मालकीची एकूण २ हेक्टर कोरडवाहू, १ हेक्टर उपसिंचनाखालील अथवा अर्धा एकर सिंचनाखालील जमीन असता कामा नये. (दुष्काळग्रस्त भागासाठी ही मर्यादा दुप्पट आहे)<br>• याव्यतिरिक्त, दि. ९.९.२००८ च्या सरकारी अधिसूचनेनुसार, सर्व विडी कामगार आणि पारधी तसेच कोल्हाटी जमातीतील सर्व सदस्यांना, तात्पुरत्या स्वरूपात, दारिद्र्यरेषेखाली असणारी शिधापत्रिका देण्यात येईल.<br>• याव्यतिरिक्त, दि. २९.९.२००८ आणि २१.२.२००९ च्या सरकारी अधिसूचनेनुसार तसेच याच अधिसूचनेत दि. १७.१.२०११ साली करण्यात आलेल्या सुधारणेच्या आधारावर, सर्व परित्यक्त्या स्त्रियांना, तात्पुरत्या स्वरूपात दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिका देण्यात येईल.<br>• दि. १७.३.२००३ च्या सरकारी अधिसूचनेनुसार, बंद स्थितीतील कापडगिरण्या, सूतगिरण्या तसेच साखर कारखान्यांमधील कामगारांना तात्पुरत्या स्वरूपात दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिका देण्यात येईल. |
| **अर्ज कसा करावा :** | • पहिली पायरी म्हणजे तालुक्यातील शिधापत्रिका कार्यालयातून (सेतू सुविधा केंद्र) अर्जाचा नमुना आणावा. हा अर्ज रु. २ या दराने उपलब्ध असतो. अथवा, http://mahafood.gov.in/website/PDF_files/Ration%20Card%20Namuna1.pdf या वेबसाईटवरून डाऊनलोड करून, ए-फोर आकाराच्या पेपरवर छापून घ्यावा.<br>• अर्ज मिळाल्यानंतर, संपर्क क्रमांकासहित आवश्यक ती सर्व माहिती भरावी. कुटुंबप्रमुखाच्या नावाने हा अर्ज दाखल करावा.<br>• अर्जदाराने अर्जासोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.<br>• पुढची पायरी म्हणजे अर्जाच्या तळाशी आपली दिनांकासहित स्वाक्षरी करणे. त्याचप्रमाणे अर्जातील घोषणापत्रावरील सर्व बाबी भरल्या असल्याचीही खातरजमा करावी. या घोषणापत्राद्वारे, तुम्ही अर्जात भरलेली माहिती योग्य आहे याची खातरजमा होते. |

| | |
|---|---|
| | • अर्ज भरून झाल्यानंतर तसेच आवश्यक ती कागदपत्रे जोडल्यानंतर अर्जदाराने शिधापत्रिका कार्यालयात (सेतु सुविधा केंद्रात) जाऊन अर्ज दाखल करावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • कुटुंबप्रमुखाचे (पारपत्र) पासपोर्ट आकारातील छायाचित्र<br>• अर्जदाराच्या पत्त्याचा पुरावा (निवडणूक ओळखपत्र / पाणीबील / वीजबील / दूरध्वनी बील / पारपत्र (पासपोर्ट))<br>• वयाचा दाखला / कुटुंबप्रमुख दहावी पास असल्याचा शाळेचा दाखला<br>• आधार कार्ड / किंवा आधारकार्डासाठी अर्ज केला असल्याची पावती<br>• जुनी शिधापत्रिका असताना अर्जदार जर नवीन शिधापत्रिकेसाठी अर्ज करत असेल तर, जुनी शिधापत्रिका जमा केल्याचा किंवा रद्द केल्याचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अथवा, तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र जोडणे अनिवार्य आहे. प्रतिज्ञापत्रात, अर्जदाराने राज्यातील कोणत्याही ठिकाणी शिधापत्रिकाधारक नसल्याचे घोषित केलेले असावे.<br>• कुटुंबाची संपूर्ण माहिती<br>• उत्पन्नाचा दाखला |
| **शुल्क :** | • पिवळी शिधापत्रिका (नवीन) : रु. १०, पिवळी शिधापत्रिका (नक्कल प्रत) : रु. २० |
| **अतिरिक्त माहिती :** | ***काही शंका असल्यास पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :***<br>***अन्न नागरी पुरवठा आणि संरक्षण विभाग :***<br>***नारायण डी. मिस्त्री मार्ग, नेहरू नगर, चेंबुर, मुंबई,***<br>***महाराष्ट्र ४०००७१***<br>***दूरध्वनी : ०२२ २४१२५३५२*** |

| २. | दारिद्र्यरेषेवरील शिधापत्रिका (केशरी रंग) |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | गोरगरिबांच्या अन्नसुरक्षेबाबतीतील समस्या हाताळणे. |
| **केन्द्र की राज्य :** | जिन्नसांची जमवाजमव, त्यांची साठवणूक, वाहतूक तसेच ते उपलब्ध करून देणे ही केन्द्र सरकारची जबाबदारी आहे. तर, हक्कधारकांमधे या जिनसांचे वितरण करणे ही राज्यसरकारची जबाबदारी आहे. |
| **विभाग :** | अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग |
| **लाभ :** | जी कुटुंबे दारिद्र्यरेषेवर आहेत, परंतु तरीही गरीब आहेत, अशांना, दारिद्र्यरेषेवरील किंमतीच्या दराने गहू, तांदूळ आणि केरोसीन मिळते. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | २०१३-२०१४ या वर्षासाठी एकूण अन्नसुरक्षा अंदाजपत्रक, १,२५,००० कोटी रुपयांचे होते. या योजनेसाठी पात्र असलेल्या सर्वांना या योजनेचा लाभ मिळतो. |
| **पात्रता :** | • १५,००० रुपयांहून अधिक वार्षिक उत्पन्न असलेली आणि १ लाख रुपयांहून कमी उत्पन्न असलेली कुटुंबे<br>• कुटुंबाच्या मालकीचे एकही चारचाकी वाहक असता कामा नये. (अपवाद टॅक्सीचालक)<br>• कुटुंबाच्या एकूण मालकीची चार हेक्टर अथवा त्याहून अधिक सिंचनाखालील जमीन असता कामा नये.<br>• कुटुंबातील कोणताही सदस्य डॉक्टर किंवा वकील किंवा वास्तुविशारद किंवा सनदी लेखापाल असता कामा नये |
| **अर्ज कसा करावा :** | • पहिली पायरी म्हणजे तालुक्यातील शिधापत्रिका कार्यालयातून (सेतू सुविधा केंद्र) अर्जाचा नमुना आणावा. हा अर्ज रु. २ या दराने उपलब्ध असतो. अथवा, http://mahafood.gov.in/website/PDF_files/Ration%20Card%20Namuna1.pdf या वेबसाईटवरून डाऊनलोड करून, ए-फोर आकारच्या पेपरवर छापून घ्यावा.<br>• अर्ज मिळाल्यानंतर, संपर्क क्रमांकासहित आवश्यक ती सर्व माहिती भरावी. कुटुंबप्रमुखाच्या नावाने हा अर्ज दाखल करावा.<br>• अर्जदाराने अर्जासोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.<br>• पुढची पायरी म्हणजे अर्जाच्या तळाशी आपली दिनांकासहित स्वाक्षरी करणे. त्याचप्रमाणे अर्जातील घोषणापत्रावरील सर्व बाबी भरल्या असल्याचीही खातरजमा करावी. या घोषणापत्राद्वारे, तुम्ही अर्जात भरलेली माहिती योग्य आहे याची खातरजमा होते.<br>• अर्ज भरून झाल्यानंतर तसेच आवश्यक ती कागदपत्रे जोडल्यानंतर अर्जदाराने शिधापत्रिका कार्यालयात (सेतु सुविधा केंद्रात) जाऊन अर्ज दाखल करावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • कुटुंबप्रमुखाचे (पारपत्र) पासपोर्ट आकारातील छायाचित्र<br>• अर्जदाराच्या पत्त्याचा पुरावा (निवडणूक ओळखपत्र / पाणीबील / वीजबील / दूरध्वनी बील / पारपत्र (पासपोर्ट))<br>• वयाचा दाखला / कुटुंबप्रमुख दहावी पास असल्याचा शाळेचा दाखला<br>• आधार कार्ड / किंवा आधारकार्डासाठी अर्ज केला असल्याची पावती<br>• जुनी शिधापत्रिका असताना अर्जदार जर नवीन शिधापत्रिकेसाठी अर्ज करत असेल तर, जुनी शिधापत्रिका जमा केल्याचा किंवा रद्द केल्याचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अथवा, तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र जोडणे अनिवार्य आहे. प्रतिज्ञापत्रात, अर्जदाराने राज्यातील कोणत्याही ठिकाणी शिधापत्रिकाधारक नसल्याचे घोषित केलेले असावे.<br>• कुटुंबाची संपूर्ण माहिती<br>• उत्पन्नाचा दाखला |
| **शुल्क :** | केशरी शिधापत्रिका (नवीन) : रु. २०, केशरी शिधापत्रिका (नक्कल प्रत) : रु. ४० |
| **अतिरिक्त माहिती :** | काही शंका असल्यास पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :<br>अन्न नागरी पुरवठा आणि संरक्षण विभाग :<br>नारायण डी. मिस्त्री मार्ग, नेहरू नगर, चेंबुर, मुंबई,<br>महाराष्ट्र ४०००७१<br>दूरध्वनी : ०२२ २४१२५३५२ |

| ३. | अंत्योदय अन्न योजना |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुढाकाराने २५ डिसेंबर २००० साली अंत्योदय अन्न योजना सुरू करण्यात आली. देशाच्या शहरी तसेच ग्रामीण भागातील गरीबातल्या गरीब नागरिकाची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्याप्रती, क्षुधामुक्त भारत निर्माण करण्याप्रती तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील त्रुटी काढून त्यात सुधारणा आणण्याप्रती भारत सरकारची असलेली कटिबद्धता या योजनेतून प्रतिबिंबित होते. गरीबातल्या गरीबाची अन्नाची गरज भागवणे या हेतूने महाराष्ट्रात या योजनेचा १ मे २००१ पासून प्रारंभ करण्यात आला. |
| **केन्द्र की राज्य :** | जिन्नसांची जमवाजमव, त्यांची साठवणूक, वाहतूक तसेच ते उपलब्ध करून देणे ही केन्द्र सरकारची जबाबदारी आहे. तर, हक्कधारकांमधे या जिनसांचे वितरण करणे ही राज्यसरकारची जबाबदारी आहे. |
| **विभाग :** | अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग |
| **लाभ :** | या योजनेखालील येणाऱ्या कुटुंबांचे निर्धारीकरण झाल्यानंतर, त्या कुटुंबांना, नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यामार्फत 'अंत्योदय शिधापत्रिका' अशी वेगळी शिधापत्रिका देण्यात येते. या शिधापत्रिकेत किती प्रमाणात अन्नधान्य मिळणार आहे यासह अंत्योदय कुटुंबाचा आवश्यक तपशील भरलेला असतो. 'अंत्योदय शिधापत्रिका'धारक कुटुंबे, स्थानिक सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत (पी डी एस) असणाऱ्या स्वस्त धान्य दुकानातून अथवा रेशन दुकानातून (एफ पी एस) धान्य विकत घेऊ शकतात. काही निवडक कुटुंबांना, २ रुपये प्रतिकिलो दराने, दरमहा ३५ किलोग्रॅम पर्यंत गहू आणि ३ रुपये प्रति किलो दराने तांदूळ घेण्याचा हक्क मिळतो. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सन २००० मधे जेव्हा ही योजना सुरू करण्यात आली तेव्हा, १ मार्च २००० पर्यंत, देशभरात ६.५२ कोटी कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली असतील असा अंदाज होता. अशा अंत्योदय कुटुंबातील एक कोटी कुटुंबे म्हणजे देशातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबापैकी १५.३३% हिस्सा आहे. राज्यातल्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांमधून अशा कुटुंबांचा शोध घेण्याचे काम त्या त्या राज्यशासनाला किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाला सोपवण्यात आले. वर्षभरात दोन वेळच्या जेवणाचीसुद्धा ज्यांना भ्रांत असते अशा कुटुंबांना या योजनेसाठी लक्ष्य करण्यात आले. अशा लक्ष्यित गटांतील कुटुंबांची क्रयशक्ती इतकी कमी असते की त्यांना दारिद्र्यरेषेखालील भावाने देखील धान्य विकत घेणे परवडत नाही. अंदाजे पाच कोटी लोकसंख्या अथवा १ कोटी कुटुंबांना या योजनेत समाविष्ट करून घेण्यात आले. |
| **पात्रता :** | या योजनेसाठी, खालील निकषांवर, दारिद्र्यरेषेखालील असे वर्गीकरण केलेल्यांपैकी कुटुंबांची निवड करण्यात आली.<br>• भूमीहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, ग्रामीण कारागीर जसे कुंभार, कातडी कमावणारे (चर्मकार), विणकर, लोहार, सुतार, झोपडपट्ट्यांतून राहणारे, तसेच अनौपचारिक क्षेत्रातील, रोजंदारीवर उपजिविका करणारे (कुंभार, हमाल, रिक्षावाहक, हातगाडी वाहक, फळे आणि फूल विक्रेते, गारूडी, कचरा वेचणारे, चांभार, वंचित घटकातील नागरिक) तसेच शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागातील वंचित घटकातील नागरिक.<br>• ज्या कुटुंबांची उपजिविका, विधवा, दीर्घ आजार असलेल्या रुग्ण व्यक्ती किंवा दिव्यांग व्यक्ती किंवा ६० वर्षे वयावरील व्यक्ती किंवा निर्वाहाचे ठोस साधन नसलेल्या तसेच कोणताही सामाजिक आधार नसलेल्या व्यक्तींवर अवलंबून असते<br>• एकच विधवा, दीर्घ आजार असलेल्या रुग्ण व्यक्ती किंवा दिव्यांग व्यक्ती किंवा ६० वर्षे वयावरील व्यक्ती किंवा निर्वाहाचे ठोस साधन नसलेल्या तसेच कोणताही सामाजिक आधार नसलेल्या व्यक्ती<br>• सर्व आदीम आदिवासी जमातीतील कुटुंबे (उदा. माडिया, कोलम, कातकरी)<br>• कुष्ठरोगी अथवा कुष्ठरोगातून बरे झालेल्या व्यक्तींवर उपजिविका अवलंबून असलेली कुटुंबे<br>• अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका, पात्र कुटुंबांना वितरित करताना, एच आय व्ही/एडस् बाधित व्यक्तींना प्राधान्यक्रम देण्यात येतो. |

| | |
|---|---|
| **अर्ज कसा करावा :** | १. **ग्रामीण भागाकरिता :** ग्रामीण भागात राहणाऱ्या व्यक्तींनी या योजनेसाठी अर्ज करताना, एका कोऱ्या कागदावर, कुटुंबातील सर्व सदस्यांच्या मिळकतीचा तपशील आणि इतर माहिती लिहून ती आपल्या भागातील ***सरपंचाकडे*** सादर करावी. सदर कुटुंब या योजनेस पात्र आहे किंवा नाही याचा निर्णय ***ग्रामसभेत*** करण्यात येतो. कुटुंबांची निवड केल्यानंतर, त्या यादीला ***ग्रामीण विकास विभागाची*** मंजूरी मिळते आणि त्यानंतर, ***प्रधान किंवा जिल्हा अन्न आणि पुरवठा नियंत्रक (डी एफ एस सी)*** अथवा ***अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार विभागा*** मार्फत ***अंत्योदय शिधापत्रिका*** जारी करण्यात येतात.<br>२. **शहरी भागाकरिता :** शहरी भागात राहणाऱ्या व्यक्तींनी या योजनेसाठी आपला अर्ज, एका कोऱ्या कागदावर लिहून ***अधिसूचित क्षेत्र समितीकडे*** सादर करावा. कुटुंबांची निवड केल्यानंतर, त्या यादीला ***नगर विकास विभागाची*** मंजूरी मिळाल्यानंतर, ***जिल्हा अन्न आणि पुरवठा नियंत्रकांमार्फत (डी एफ एस सी)*** अथवा त्या विभागातील अधिकृत निरिक्षकामार्फत ***अंत्योदय शिधापत्रिका*** जारी करण्यात येते. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • आपल्याकडे जुनी कोणतीही शिधापत्रिका नाही हे प्रमाणित करण्यासाठी जुनी शिधापत्रिका रद्द केल्याचा दाखला किंवा त्यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र दाखल करणे गरजेचे आहे.<br>• त्या भागातील संबंधित ***तलाठ्याकडून*** प्रमाणित करण्यात आलेला कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला |
| **शुल्क :** | नि:शुल्क, कोणतेही शुल्क नाही |
| **अतिरिक्त माहिती :** | ***काही शंका असल्यास पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :***<br>***अन्न नागरी पुरवठा आणि संरक्षण विभाग :***<br>***नारायण डी. मिस्त्री मार्ग, नेहरू नगर, चेंबुर, मुंबई,***<br>***महाराष्ट्र ४०००७१***<br>***दूरध्वनी : ०२२ २४१२५३५२*** |

| ४. | अन्नपूर्णा |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | राष्ट्रीय वृद्धावस्था निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत (एन ओ ए पी एस) पात्र असूनही जे ज्येष्ठ नागरिक या योजनेचे लाभार्थी होऊ शकले नाहीत अशा ज्येष्ठ नागरिकांना अन्न सुरक्षा पुरवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. दि. १ एप्रिल २००१ पासून महाराष्ट्र राज्यात ही योजना अंमलात आणण्यात आली. ही योजना १००% केन्द्र सरकारद्वारा पुरस्कृत आहे. |
| **केन्द्र की राज्य :** | जिन्नसांची जमवाजमव, त्यांची साठवणूक, वाहतूक तसेच ते उपलब्ध करून देणे ही केन्द्र सरकारची जबाबदारी आहे. तर, हक्कधारकांमधे या जिनसांचं वितरण करणे ही राज्यसरकारची जबाबदारी आहे. |
| **विभाग :** | अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग |
| **लाभ :** | अन्नपूर्णा योजनेअंतर्गत लाभार्थींना दरमहा १० किलोग्रॅम धान्य मोफत पुरवण्यात येते.<br>• ***ग्रामपंचायतीने***, ***अन्नपूर्णा*** योजनेसाठी पात्र असलेल्या व्यक्ती ओळखून, त्यांची यादी प्रदर्शित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या योजनेची साद्यंत माहिती तसेच त्याचा लाभ मिळण्यासाठी करावी लागणारी प्रक्रिया याबद्दलही माहिती पुरवणे आवश्यक आहे. ***अन्नपूर्णा*** योजनेची व्यापक प्रसिद्धी करतानाच, लाभार्थी अन्य कोणत्या निवृत्तीवेतन योजनेचा लाभ मिळवत नाहीत ना याची खातरजमा करणे आवश्यक आहे. लाभार्थींना लाभ कार्ड वितरित करण्याची जबाबदारी ***ग्रामपंचायतीची*** असेल.<br>• शहरी भागात, ही योजना राबवण्यासाठी, वर उल्लेख करण्यात आलेले सर्व उपक्रम राबवण्याची जबाबदारी त्या त्या भागातील नगरपालिकांची आहे.<br>• राज्य शासनाकडून ***ग्रामपंचायती*** तसेच नगरपालिकांना ‘अन्नपूर्णा’ योजनेसाठी किती लाभार्थी मिळवावेत याचे लक्ष्य निर्धारित करून देण्यात येईल. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | १९९५ साली कार्यान्वित करण्यात आलेल्या राष्ट्रीय वृद्धावस्था निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत (एन ओ ए पी एस), ६५ वर्षे वयावरील निराधार व्यक्तींना दरमहा रुपये २०० निवृत्तीवेतन दिले जाते. सन २००१ साली, जेव्हा ***अन्नपूर्णा योजना*** अस्तित्वात आली तेव्हा, पहिल्या टप्प्यात सर्व राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशातील एन ओ ए पी एस अंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यासाठी पात्र असणाऱ्यांपैकी २०% व्यक्तींना या ***अन्नपूर्णा योजनेचा*** लाभ मिळाला. आर्थिक निधीच्या उपलब्धतेनुसार तसेच राज्यातील अधिकाऱ्यांच्या कामगिरीनुसार, टप्प्याटप्प्याने लाभार्थी जोडत जावेत असे प्रस्तावित करण्यात आले होते. वास्तविक परिस्थितीनुरूप, राज्य सरकारांनी हे वाटप जिल्ह्याजिल्ह्यांत करणे आवश्यक होते. लाभार्थी हुडकणे हेच सर्वात पहिले आणि महत्त्वाचे पाऊल होते आणि राज्य सरकारांनी यासाठी तात्काळ कारवाई करणे अपेक्षित होते. |
| **पात्रता :** | खालील निकष पूर्ण करणाऱ्या व्यक्तींना अन्नपूर्णा योजनेअंतर्गत केन्द्र सरकारकडून मदत दिली जाते.<br>• अर्जदार पुरुष अथवा महिलेचे वय ६५ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.<br>• अर्जदार खऱ्या अर्थाने ‘निराधार’ असावा – अर्थात् – त्याचे/तिचे स्वत:चे निर्वाहाचे साधन अतिशय तुटपुंजे असेल अथवा ते कुटुंबातील अन्य व्यक्तीकडून असेल किंवा अन्य स्रोतांमार्फत निर्वाह होत असेल. ‘निराधार अथवा निराश्रीत’ म्हणजे नेमके काय हे निर्धारित करण्यासाठी राज्य सरकार / केंद्रशासित प्रदेशांच्या सध्याच्या निकषांचा (जर असतील तर) देखील आधार घेता येऊ शकतो.<br>• अर्जदाराला एन ओ ए पी एस अथवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळत नसावे. |
| **अर्ज कसा करावा :** | मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र वगळता, अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज, ग्रामसेवक / तलाठी /प्रभाग अधिकारी/नगरपालिकेचा प्रमुख अधिकारी यांच्या मार्फत संबंधित तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी, अर्जदाराने आपला अर्ज, शिधावाटप अधिकाऱ्यामार्फत, शिधावाटप नियंत्रक, रॉयल इन्श्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई या पत्त्यावर सादर करावा. काही अडचण/शंका असल्यास तहसीलदार अथवा जिल्हाधिकारी/नियंत्रक यांच्याशी संपर्क साधावा. |

| | |
|---|---|
| **आवश्यक कागदपत्रे :** | केवळ वयाचा दाखला |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| अतिरिक्त माहिती : | ***काही शंका असल्यास पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :***<br>***अन्न नागरी पुरवठा आणि संरक्षण विभाग :***<br>***नारायण डी. मिस्त्री मार्ग, नेहरू नगर, चेंबुर, मुंबई,***<br>***महाराष्ट्र ४०००७१***<br>***दूरध्वनी : ०२२ २४१२५३५२*** |

| ५. | एकाात्मिक बालविकास सेवा (आय सी डी एस) दुहेरी पोषण |
|---|---|
| सयुक्तिकता : | भारत सरकारची ही पथदर्शी योजनेचा आरंभ २ ऑक्टोबर १९७५ रोजी कार्यान्वित करण्यात आली. बालसंगोपन आणि विकास यावर आधारित ही जगातील सर्वात मोठी आणि एकमेवाद्वितीय अशी ही योजना आहे. बालक आणि स्तनदा (स्तनपान देणाऱ्या) मातांच्या शिफारस करण्यात आलेल्या आहारभत्ता (आर डी ए) आणि सरासरी दैनिक सेवन (ए डी आय) यातील दरी भरून काढण्याकरता पूरक पोषण आहाराची तरतूद करणे यासाठीच ही योजना (आय सी डी एस) प्रामुख्याने सुरू करण्यात आली.<br>• ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचा पोषण आणि आहाराचा दर्जा सुधारणे<br>• बालकांमधे योग्य मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाचा पाया रचणे<br>• मृत्यू, विकृती, कुपोषण आणि शाळेतून होणाऱ्या गळतीचे प्रमाण कमी करणे<br>• बालविकासाला उत्तेजन/प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने, विविध विभागांतील योजना आणि अंमलबजावणी यांचा परिणामकारक, प्रभावी समन्वय साधणे; आणि<br>• योग्य पोषण आणि आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून बालकांच्या सामान्य आरोग्य आणि पोषणाच्या गरजा जपण्यासाठी मातांना अधिक सक्षम बनवणे |
| केन्द्र की राज्य : | केन्द्र सरकार |
| विभाग : | महिला आणि बालकल्याण मंत्रालय आणि आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय |
| लाभ : | आय सी डी एस योजनेअंतर्गत खालील सहा सेवा पुरवण्यात येतात. जसे की,<br>• पूरक पोषण<br>• शालापूर्व अनौपचारिक शिक्षण<br>• पोषण आणि आरोग्यविषयक शिक्षण<br>• लसीकरण<br>• आरोग्यतपासणी, आणि<br>• संदर्भ सेवा<br><br>२००९ सालापासून अंमलात आणण्यात आलेल्या सुधारित पोषण आणि आहार निकषांअंतर्गत, राज्य सरकार तसेच केंद्रशासित प्रदेशांनी लाभार्थींना दरवर्षी ३०० दिवस पूरक आहार द्यावा अशी विनंती करण्यात आली होती. ज्यायोगे, ३ ते ६ वर्षे वयोगटातील, ए डब्ल्यू सी ला भेट देणाऱ्या बालकांना एक किंवा त्यापेक्षा जास्त वेळेची जेवणे देणे राज्य सरकार तसेच केंद्रशासित प्रदेशांना अनिवार्य झाले. या अंतर्गत, सकाळच्या नाष्ट्यात दूध/केळे/अंडे/ऋतुकालीन फळे/मायक्रोन्यूट्रिअंट फोर्टिफाईड प्रकारच्या अन्ने आणि त्यानंतर गरम शिजवलेल्या अन्नाचा (एच सी एम) यात समावेश होतो.<br><br>***अंगणवाडी*** केंद्रांमार्फत बालकांना पोषक आहार पुरवण्यात येतो. राज्या-राज्यानुसार अन्नातील पोषणघटक बदलतात, परंतु ***अंगणवाडीत*** तयार करण्यात आलेल्या ताज्या, गरम जेवणात सामान्यत:, डाळी, कडधान्ये, तेल, भाज्या, साखर, आयोडिनयुक्त मीठ वगैरे हेच पदार्थ अंतर्भूत असतात. कधी कधी, तीन वर्षे वयोगटाच्या बालकांसाठी, 'शिधा घरी न्या' (टी एच आर) ही सुविधा पुरवली जाते.<br><br>विविध प्रकारच्या लाभार्थींना देण्यात येणारे पोषक पूरक आहाराचे प्रमाण खाली नमूद करण्यात आले आहे :<br><br>तीन वर्षे वयाखालील बालके, गर्भवती स्त्रिया आणि स्तन्य मातांसाठी विविध धान्यांच्या मिश्रणाच्या स्वरूपात/ तत्काळ खाता येण्याजोग्या आहाराच्या स्वरूपात घरी नेण्यास शिधा (टी एच आर्स) पुरवण्यात येतो. त्याशिवाय, ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील अतिशय कमी वजनाच्या बालकांसाठी मायक्रोन्यूट्रीअंट फोर्टिफाईड स्वरूपातील अन्न तसेच/किंवा भरपूर ऊर्जा प्रदान करणाऱ्या आहाराचा शिधा घरी नेण्यासाठी देण्यात येतो. २२ एप्रिल २००९ च्या |

आदेशानुसार, हे निकष देखील सर्वोच्च न्यायालयाच्या मान्यतेनुसार आहेत.

शेवटच्या तीन सेवा, एन आर एच एम तसेच आरोग्य व्यवस्थेच्या माध्यमातून, आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय/विभाग द्वारा राबवल्या जातात.

लाभार्थींना पुढील सेवा पुरवल्या जातात :

| **सेवा** | **लक्ष्य गट** | **सेवा पुरवणारी संस्था** |
|---|---|---|
| (१) पूरक पोषण | ६ वर्षे वयाच्या आतील बालके, गर्भवती आणि स्तन्य माता (पी अँड एल एम) | अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीस (एम डब्ल्यू सी डी) |
| (२)लसीकरण* | ६ वर्षे वयाच्या आतील बालके, गर्भवती आणि स्तन्य माता (पी अँड एल एम) | ए एन एम/एम ओ (आरोग्य व्यवस्था, एम एच एफ डब्ल्यू) |
| (३) आरोग्य तपासणी* | ६ वर्षे वयाच्या आतील बालके, गर्भवती आणि स्तन्य माता (पी अँड एल एम) | ए एन एम/एम ओ/ए डब्ल्यू डब्ल्यू (आरोग्य व्यवस्था, एम एच एफ डब्ल्यू) |
| (४) संदर्भ सेवा | ६ वर्षे वयाच्या आतील बालके, गर्भवती आणि स्तन्य माता (पी अँड एल एम) | ए डब्ल्यू डब्ल्यू /ए एन एम/एम ओ/ (आरोग्य व्यवस्था, एम एच एफ डब्ल्यू) |
| (५) शालापूर्व शिक्षण | ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालके | ए डब्ल्यू डब्ल्यू (एम डब्ल्यू सी डी) |
| (६) पोषण आणि आरोग्य शिक्षण | महिला (१५ ते ४५ वर्षे वयोगटातील) | ए डब्ल्यू डब्ल्यू/ए एन एम/एम ओ (आरोग्य व्यवस्था, एम एच एफ डब्ल्यू आणि एम डब्ल्यू सी डी ) |

* लक्ष्य गट ओळखण्यासाठी ए डब्ल्यू डब्ल्यू ची ए एन एम ना मदत होते.

| | |
|---|---|
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | (२०११ मधील जनगणनेनुसार) देशात ० ते ६ वर्षे वयोगटातील १५८ दशलक्ष बालके आहेत. हीच बालके देशाचे भावी मनुष्यबळ आहे. महिला आणि बालकल्याण मंत्रालय, बालकांच्या कल्याण, विकास तसेच सुरक्षेसाठी विविध योजना राबवत आहे. |
| **पात्रता :** | ६ वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती महिला तसेच स्तन्य माता, आय सी डी एस योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र आहेत. आय सी डी एस योजनेसाठी नोंदणी करण्याकरता, दारिद्र्यरेषेखाली असणे या निकष लागू होत नाही. ही योजना सार्वत्रिक असून, सर्व वर्गांच्या लाभार्थींना याचा लाभ मिळू शकतो. |
| **अर्ज कसा करावा :** | अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या ***अंगणवाडीशी*** संपर्क साधावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | बालकाचे जन्मप्रमाणपत्र |
| **शुल्क :** | नि:शुल्क, कोणतेही शुल्क नाही |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही. |

## ब. निवृत्तीवेतन आणि सामाजिक सुरक्षा योजना

| ६. | इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | विधवांसाठी निवृत्तीवेतनाची तरतूद करणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | या योजनेअंतर्गत लाभार्थीला दरमहा रु. २०० दिले जातात (तसेच ***संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत*** दरमहा अतिरिक्त ४०० रुपये दिले जातात. ही योजना राज्यशासन पुरस्कृत आहे.) |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र विधवांना या योजनेचा लाभ देणे. तसेच राज्यशासन आणि केन्द्र सरकारांना यासंदर्भात प्रमाणपत्र जारी करण्याची विनंती करण्यात आली आहे. |
| **पात्रता :** | • ४० ते ६५ वर्षे वयोगटातील विधवा<br>• महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास<br>• कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपयांपर्यंत असावे अथवा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील व्यक्ती |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • अर्ज<br>• वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला वयाचा दाखला<br>• तलाठ्याने जारी केलेले निवासी प्रमाणपत्र<br>• उत्पन्नाचा दाखला/तलाठ्याद्वारा जारी केलेला कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला<br>• पतीच्या मृत्यूचा दाखला |
| **शुल्क :** | अंशदानेतर योजना |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| ७. | **संजय गांधी निराधार अनुदान योजना** |
| --- | --- |
| **सयुक्तिकता :** | निराधार व्यक्ती, अंध, दिव्यांग, अनाथ बालके, गंभीर आजार असलेल्या व्यक्ती, घटस्फोटित महिला, परित्यक्ता, दयनीय स्थितीतील महिला, वेश्याव्यवसायातून मुक्त करण्यात आलेल्या महिला, लिंगबदल केलेल्या व्यक्ती |
| **केन्द्र की राज्य :** | राज्य सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थीला दरमहा रु. ६०० दिले जातात. तसेच एका कुटुंबात एकापेक्षा अनेक लाभार्थी असतील तर प्रत्येक लाभार्थीला दरमहा रु. ९०० देण्यात येतात. लाभार्थींची अपत्ये २५ वर्षे वयाची होईपर्यंत अथवा त्यांना रोजगार मिळेपर्यंत, जे सगळ्यात आधी होईल, हा लाभ देण्यात येतो. जर लाभार्थी केवळ एक मुलगी किंवा मुली असतील तर ती/त्या २५ वर्षे वयाच्या होईपर्यंत अथवा तिचा/त्यांचा विवाह होईपर्यंत हा लाभ देण्यात येतो. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र लाभार्थींना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. |
| **पात्रता :** | • ६५ वर्षांहून अधिक असता कामा नये<br>• एडस्, टी. बी. किंवा दिव्यांगत्वासारख्या मानिसिक तसेच शारीरिक दौर्बल्यामुळे रोजगार कमवण्यास सक्षम नसलेल्या व्यक्ती<br>• आर्थिक आधार नसलेल्या विधवा<br>• महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास असावा<br>• कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपयांहून अधिक असता कामा नये<br>• कोणत्याही आर्थिक किंवा धार्मिक अनुदानित संस्थेचा सदस्य नसावा |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सरकारी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या विहित नमुन्यात अर्ज भरावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • अर्ज<br>• वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला वयाचा दाखला<br>• तलाठ्याने जारी केलेले निवासी प्रमाणपत्र<br>• उत्पन्नाचा दाखला/तलाठ्याद्वारा जारी केलेला कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला<br>• सरकारी रुग्णालयातील सिव्हिल सर्जन आणि वैद्यकीय अधिक्षकाने जारी केलेला दौबर्ल्याचा/आजारपणाचा दाखला |
| **शुल्क :** | अंशदानेतर योजना |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| ८. | **इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांगत्व निवृत्तीवेतन योजना अथवा<br>इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांगत्व निवृत्तीवेतन योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | दिव्यांग व्यक्तींना मासिक निवृत्तीवेतन देणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | या योजनेअंतर्गत लाभार्थीला दरमहा रु. २०० दिले जातात (तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दरमहा अतिरिक्त ४०० रुपये दिले जातात. ही योजना राज्यशासन पुरस्कृत आहे.) |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र लाभार्थींना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. |
| **पात्रता :** | • १८ ते ६५ वर्षे वयोगटातील विकलांग/दिव्यांग व्यक्ती. विकलांगत्वाचे/दिव्यांगत्वाचे प्रमाण ८०% असावे.<br>• महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास असावा<br>• कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपयांहून अधिक असता कामा नये अथवा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात असणारी व्यक्ती |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सरकारी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या विहित नमुन्यात अर्ज भरावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • अर्ज<br>• वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला वयाचा दाखला<br>• तलाठ्याने जारी केलेले निवासी प्रमाणपत्र<br>• उत्पन्नाचा दाखला/तलाठ्याद्वारा जारी केलेला कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला<br>• केन्द्र सरकारच्या निकषांवर आधारित विकलांगत्वाचा दाखला |
| **शुल्क :** | अंशदानेतर योजना |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| ९. | **श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | निराधार वृद्ध/वृद्ध व्यक्तींना मासिक निवृत्तीवेतन देणे |
| **केन्द्र की राज्य :** | राज्य सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | या योजनेअंतर्गत, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २१ हजार किंवा त्याहून कमी असलेल्या, परंतु दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात गणना नसलेल्या निराधार व्यक्तीला दरमहा रु. ६०० इतकी रक्कम देण्यात येते. त्याचप्रमाणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील निराधार व्यक्तीला दरमहा रु. ४०० देण्यात येतात त्याचबरोबर, ***इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था योजनेअंतर्गत*** दर महिना रु. २०० देण्यात येतात. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र लाभार्थींना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. |
| **पात्रता :** | • ६५ वर्षे अथवा त्याहून अधिक वयाच्या निराधार व्यक्ती<br>• महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास असावा<br>• कोणत्याही आर्थिक किंवा धार्मिक अनुदानित संस्थेचा सदस्य नसावा<br>• कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपयांपर्यंत असणाऱ्या किंवा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील व्यक्ती |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सरकारी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या विहित नमुन्यातअर्ज भरावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • अर्ज<br>• वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला वयाचा दाखला<br>• तलाठ्याने जारी केलेले निवासी प्रमाणपत्र<br>• उत्पन्नाचा दाखला/तलाठ्याद्वारा जारी केलेला कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला |
| **शुल्क :** | अंशदानेतर योजना |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| १०. | **राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची प्रमुख कमावणारी व्यक्ती निवर्तल्यास अशा कुटुंबाना आर्थिक मदत प्रदान करणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | कुटुंबातील, १८ ते ५९ वर्षे वयोगटातील, मुख्य कमावणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, कुटुंबाला एकदाच एकरकमी २ लाख रुपये देण्यात येतात. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र लाभार्थींना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. |
| **पात्रता :** | • महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास असावा<br>• दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा सदस्य |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सरकारी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या विहित नमुन्यातअर्ज भरावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • छायाचित्रासहित पूर्ण भरलेला अर्ज<br>• वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला, मुख्य कमावत्या व्यक्तीचा वयाचा दाखला आणि मृत्यूप्रमाणपत्र<br>• तलाठ्याने जारी केलेले निवासी प्रमाणपत्र<br>• उत्पन्नाचा दाखला/तलाठ्याद्वारा जारी केलेला कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला |
| **शुल्क :** | अंशदानेतर योजना |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| ११. | **इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | दारिद्र्यरेषेखाली प्रवर्गात मोडणाऱ्या, ६५ वर्षे किंवा त्याहून अधिक वय असणाऱ्या, उत्पन्नाचा नियमित स्त्रोत नसणाऱ्या अथवा कोणतीही आर्थिक मदत नसणाऱ्या व्यक्तींना आर्थिक सहाय्य करणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | या योजनेअंतर्गत लाभार्थीला दरमहा रु. २०० दिले जातात (तसेच ***श्रावण बाळ राज्य सेवा निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत*** दरमहा अतिरिक्त ४०० रुपये दिले जातात. ही योजना राज्यशासन पुरस्कृत आहे.) |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र लाभार्थींना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. |
| **पात्रता :** | • ६५ वर्षे किंवा त्याहून अधिक वय असणाऱ्या निराधार व्यक्ती<br>• महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास असावा<br>• कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपयांपर्यंत असणाऱ्या किंवा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील व्यक्ती |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सरकारी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या विहित नमुन्यातअर्ज भरावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • अर्ज<br>• वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला, वयाचा दाखला<br>• तलाठ्याने जारी केलेले निवासी प्रमाणपत्र<br>• उत्पन्नाचा दाखला/तलाठ्याद्वारा जारी केलेला कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला |
| **शुल्क :** | अंशदानेतर योजना |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| १२. | आम आदमी बिमा योजना |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | १८ ते ५९ वर्षे वयोगटातील, मान्यता देण्यात आलेल्या ४८ व्यवसाय/उद्योगधंदा करणाऱ्या समूहातील/ग्रामीण भूमीहीन व्यक्तींना मृत्यू आणि विकलांगत्व आल्यास त्यांना संरक्षण देणे. |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार (भारतीय आयुर्विमा महामंडळ संचालित भारत सरकार सामाजिक सुरक्षा योजना) |
| **विभाग :** | भारतीय आयुर्विमा महामंडळ |
| **लाभ :** | ग्रामीण भागातील भूमीहीनांच्या हिताच्या दृष्टीने त्यांना मृत्यू तसेच विकलांगत्व आल्यास संरक्षण देणे. या योजनेअंतर्गत, नैसर्गिक अथवा अपघाती मृत्यू आल्यास तसेच अंशिक किंवा कायमस्वरूपी अंतगत्व आल्यास विमासंरक्षण देण्यात येते.<br><br>या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थीला रु. २०० वार्षिक हप्ता भरावा लागतो, ज्यातील ५०% रक्कम केन्द्र सरकारद्वारा निर्मित आणि एल आय सी द्वारा संचालित सामाजिक सुरक्षा निधीतून भरली जाते. ए ए बी वाय मार्फत, नैसर्गिक मृत्यू आल्यास रु. ३०,०००, अपघाती मृत्यू आल्यास रु. ७५,०००, अपघातामुळे अंशिक विकलांगत्व आल्यास रु. ३७,५०० (एक डोळा, एखादा अवयव निकामी होणे) आणि अपघातामुळे पूर्ण किंवा कायमस्वरूपी विकलांगत्व आल्यास (दोन्ही डोळे, दोन अवयवय किंवा एक डोळा, आणि एक अवयव) रु. ७५,००० इतके विमासंरक्षण देण्यात येते. शिवाय, या योजनेअंतर्गत एक अतिरिक्त लाभही दिला जातो. तो असा, की, प्रत्येक सदस्याच्या, नववी ते बारावी दरम्यान शिकणाऱ्या कमाल दोन मुलांना, दरमहा १०० रुपये या प्रमाणे दर सहा महिन्यांनी शिष्यवृत्ती दिली जाते. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | महाराष्ट्रात आतापर्यंत ५६ लाख पॉलिसीज जारी करण्यात आल्या आहेत. |
| **पात्रता :** | • महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास असावा<br>• १८ ते ५९ वयोगटातील असावा<br>• मान्यता देण्यात आलेल्या ४८ व्यवसाय/उद्योगधंदा करणाऱ्या समूहातील / ग्रामीण भूमीहीन व्यक्ती<br>• सामान्यत: अर्जदार कुटुंबप्रमुख असावा अथवा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील सदस्यांपैकी कमावती व्यक्ती असावा अथवा अर्जदार, व्यवसाय/उद्योगधंदा करणाऱ्या समूहातील / ग्रामीण भूमीहीन म्हणून गणना झालेल्या, दारिद्र्यरेषेच्या किंचित वर गटातील |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सरकारी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या विहित नमुन्यातअर्ज भरावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • अर्ज<br>• वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला, वयाचा दाखला किंवा आधारकार्डानुसार वयाचा दाखला, शिधापत्रिका, शाळेचा दाखला / जन्मप्रमाणपत्र, मान्यताप्राप्त कंपनीचे ओळखपत्र<br>• तलाठ्याने जारी केलेले निवासी प्रमाणपत्र<br>• तलाठ्याने जारी केलेले व्यवसाय/धंदा प्रमाणपत्र |
| **शुल्क :** | लाभार्थीसाठी ही योजना अंशदानेतर आहे |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| १३. | **इंदिरा गांधी निराधार भूमीहीन शेतमजूर महिला अनुदान योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | ग्रामीण भागातील भूमीहीन, एकाकी, परित्यक्ता, प्रलंबित घटस्फोटाच्या कारणाने वेगळे राहणाऱ्या महिला, तसेच घरगुती हिंसाचाराच्या बळी ठरलेल्या, ज्यांचे पती कारागृहात आहेत अथवा वेश्याव्यवसायातून ज्यांची मुक्तता झाली आहे अशा महिलांना लाभ मिळण्याच्या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील अनाथ मुलींना देखील या योजनेअंतर्गत संरक्षण देण्यात येते. |
| **केन्द्र की राज्य :** | राज्य सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | दरमहा रु. २०० पर्यंत आर्थिक लाभ |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र लाभार्थींना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. |
| **पात्रता :** | • वय ६५ वर्षांहून जास्त असता कामा नये<br>• मानसिक अथवा शारीरिक दौर्बल्यामुळे, टी. बी. सारख्या आजारामुळे, अपंगत्वामुळे कमावण्यास असमर्थ<br>• आर्थिक आधार नसलेल्या विधवा<br>• महाराष्ट्रात किमान १५ वर्षे अधिवास<br>• कोणत्याही आर्थिक किंवा धार्मिक अनुदानित संस्थेचा सदस्य नसावा<br>• उत्पन्नाचे कायमस्वरूपी स्त्रोत नसावा |
| **अर्ज कसा करावा :** | संबंधित तालुक्याचा तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सरकारी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या विहित नमुन्यातअर्ज भरावा. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • विधवा असल्यास, पतीचे मृत्यूप्रमाणपत्र<br>• पोलीस पाटील आणि सरपंच यांनी प्रमाणित केलेले, किमान एक वर्ष परित्यक्ता/एकाकी असल्याचे प्रमाणपत्र<br>• घटस्फोट प्रलंबित असल्यास, न्यायालयात सादर केलेल्या अर्जाची प्रत<br>• पती कारागृहात असल्यास, किमान सहा महिने पती कारागृहात असल्याचे पोलीस स्थानकाने जारी केलेले प्रमाणपत्र |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| १४. | **प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | १८ ते ५० वर्षे वयोगटातील, बँक खाते धारक असलेल्या व्यक्तींसाठी जीवन विमा योजना |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | कोणतीही राष्ट्रीयकृत बँक |
| **लाभ :** | १८ ते ५० वर्षे वयोगटातील, बँक खाते असलेल्या कोणाही व्यक्तीला वार्षिक ३३० रुपये हप्ता भरून, २ लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण प्राप्त करून घेता येते. ५० वर्षे वयानंतर या योजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तींना, वार्षिक हप्ते भरल्यास, ५५ वर्षे वयापर्यंत विमा संरक्षण मिळू शकते. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | पात्र तसेच, ज्यांना या योजनेत रस आहे आणि इतर अन्य कोणत्याही जीवनविम्याचे संरक्षण न घेतलेल्या व्यक्ती |
| **पात्रता :** | • १८ ते ५० वर्षे वयोगटातील, बँक खाते धारक असलेल्या व्यक्ती |
| **अर्ज कसा करावा :** | आपले बचत खाते असलेल्या बँकेतील शाखेशी संपर्क साधावा |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • बँकेचे पास बुक |
| **शुल्क :** | वार्षिक हप्ता रु. ३३० |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| १५. | **प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | १८ ते ७० वर्षे वयोगटातील, बँकखाते धारक असलेल्या व्यक्तींसाठी अपघाती विमासंरक्षण योजना |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | कोणतीही राष्ट्रीयकृत बँक |
| **लाभ :** | १८ ते ७० वर्षे वयोगटातील, बँक खाते असलेल्या कोणाही व्यक्तीला वार्षिक १२ रुपये हप्ता भरून, अपघातात मृत्यू आल्यास अथवा जखमी झाल्यास २ लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण प्राप्त करून घेता येते. अपघातादरम्यान दोन्ही डोळे निकामी झाल्यास अथवा दोन्ही हात किंवा पाय निकामी झाल्यास, विमाधारकाला दोन लाख रुपये मिळतात. विमाधारकाचा अपघातादरम्यान मृत्यू झाल्यास, त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीला २ लाख रुपये इतकी रक्कम प्राप्त होते. अपघातादरम्यान जर एका डोळ्याची दृष्टी गेली तसेच एक हात किंवा पाय जायबंदी झाल्यास विमाधारकाला १ लाख रुपये इतकी रक्कम प्राप्त होते. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | पात्र तसेच, ज्यांना या योजनेत रस आहे आणि इतर अन्य कोणत्याही जीवनविम्याचे संरक्षण न घेतलेल्या व्यक्ती |
| **पात्रता :** | • १८ ते ७० वर्षे वयोगटातील, बँक खाते धारक असलेल्या व्यक्ती |
| **अर्ज कसा करावा :** | आपले बचत खाते असलेल्या बँकेतील शाखेशी संपर्क साधावा |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • बँकेचे पास बुक |
| **शुल्क :** | वार्षिक हप्ता रु. १२ |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

| १६. | **कर्मचारी राज्य विमा योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | स्वयं अर्थसहाय्यित सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य विमा योजना |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार (कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ई एस आय सी) द्वारा संचालित भारत सरकार सामाजिक सुरक्षा योजना) |
| **विभाग :** | कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ई एस आय सी) |
| **लाभ :** | या निधीसाठी नियोक्त्याचे योगदान ४.७५% इतके तर कर्मचाऱ्याचे योगदान १.७५% इतके असते. या योजनेअंतर्गत नोंदणी झालेल्या कर्मचाऱ्यांना, त्यांना तसेच त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांना वैद्यकीय लाभ, अकस्मात बेरोजगारी आल्यास रोख अर्थसहाय्य लाभ, महिलांना प्रसूतीलाभ इत्यादि प्रकारचे लाभ मिळतात. कामाच्या ठिकाणी विकलांगत्व आल्यास अथवा मृत्यू झाल्यास, विकलांगता लाभही उपलब्ध आहे. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | भौगोलिक व्याप्ती : राज्ये : मणीपूर, सिक्कीम, अरूणाचल प्रदेश आणि मिझोराम वगळता सर्व राज्यात उपलब्ध<br>केंद्रशासित प्रदेश : दिल्ली आणि चंदीगड<br>**(३१ मार्च, २०१४ नुसार) लाभार्थींचा तपशील**<br>विमा घेतलेले कुटुंब युनिट संख्या : १.९५ कोटी<br>कर्मचारी संख्या : १.७४ कोटी<br>एकूण लाभार्थी : ७.५८ कोटी<br>विमासंरक्षण प्राप्त महिला : ०.२९ कोटी |
| **पात्रता :** | • कलम २(१२) अंतर्गत, १० किंवा जास्त कामगार असलेल्या, बिगर-हंगामी कारखान्यांना हा कायदा लागू होतो.<br>• कायद्याच्या कलम १(५) अंतर्गत, ही योजना, २० किंवा त्याहून अधिक कर्मचारी असलेली दुकाने, हॉटेल्स, रेस्टॉरंटस्, सिनेमागृहे, यात प्रिव्ह्यू थिएटरही अंतर्भूत आहे. रस्ते-मोटार वाहतूक आस्थापने तसेच वर्तमानपत्रांची आस्थापने यांकरिता विस्तारित करण्यात आली.<br>• त्यानंतर, कायद्याच्या कलम १(५) अंतर्गत, ही योजना, विशिष्ट राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील, २०* किंवा त्याहून अधिक कर्मचारी असलेल्या खाजगी वैद्यकीय आणि शैक्षणिक संस्था यांकरिता विस्तारित करण्यात आली.<br>* टीप : १४ राज्य सरकारे/केंद्र शासित प्रदेशांनी, दुकाने आणि इतर आस्थापनांमधील विमा संरक्षणासाठी कर्मचारी संख्या २० वरून कमी करून १० किंवा जास्त कर्मचारी अशी केली. इतर राज्य सरकारे/केंद्रशासित प्रदेशांमधे देखील अशा पद्धतीने कर्मचारी संख्या कमी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.<br>• या कायद्याअंतर्गत संरक्षण मिळण्यासाठी विद्यमान वेतन मर्यादा दरमहा १५,००० रुपये इतकी आहे. (दि. १.५.२०१० पासून लागू)<br>• विकलांग/वेगळ्या तऱ्हेचे अपंगत्व असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वेतनमर्यादा दरमहा २५,००० रुपये इतकी आहे. तसेच पहिल्या ३ वर्षांसाठी नियोक्त्याकडून दिले जाणारे योगदान केन्द्र सरकारतर्फे भरण्यात येते.<br>* टीप : या योजनेअंतर्गत, योगदान कालावधीच्या सुरुवातीला विमा संरक्षण प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्याचा, योगदान कालावधी सुरू झाल्यानंतर, कोणत्याही वेळी, निर्धारित वेतन वाढून, निर्धारित वेतनाच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त झाले तरीही त्याला संरक्षित कालावधीपर्यंत विमा संरक्षण मिळू शकते. |
| **अर्ज कसा करावा :** | काम करत असलेल्या आस्थापनामार्फत |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • पगाराचे प्रमाणपत्र<br>• ओळखपत्र<br>• कामावर रुजू झालेल्या तारखेचा दाखला |
| **शुल्क :** | दरमहा १.७५% योगदान पगारातून वजा होते |
| **अतिरिक्त माहिती :** | ***लागू होत नाही*** |

## क. प्रसूतीलाभ समावेशक आरोग्य योजना

| १७. | राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | दारिद्र्यरेषेखालील तसेच दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांना (नागरी पुरवठा विभागाने प्रमाणित केलेल्या श्वेतकार्ड धारक कुटुंबे वगळता) चांगल्या दर्जाची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे तसेच ज्या विशेष सेवांमधे, शस्त्रक्रियेसाठी किंवा औषधोपचारासाठी किंवा आरोग्यविषयक सल्ल्यासाठी इस्पितळात राहणे गरजेचे असते अशा सेवा निर्धारित आरोग्यसेवा पुरवणाऱ्यांमार्फत पुरवणे. |
| **केन्द्र की राज्य :** | राज्य सरकार |
| **विभाग :** | राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना संस्था |
| **लाभ :** | • प्रतिवर्षी दीड लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य विमा पुरवणे<br>• हे वार्षिक संरक्षण पर्यायी स्वरूपात उपलब्ध आहे. जसे की, वैयक्तिक अथवा कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी<br>• प्रति कुटुंब, रु. ३३३ इतका वार्षिक हप्ता सरकारतर्फे भरण्यात येतो<br>• पॅनेलवर असलेली रुग्णालये रोखरहित सेवा पुरवतात. लाभार्थीला कोणतीही अनामत रक्कम भरावी लागत नाही. रुग्णायलाने जरी सर्व प्रक्रियेसाठी जादा शुल्क मागितले, तरी लाभार्थीला कोणतीही रक्कम द्यावी लागत नाही. त्याशिवाय, या योजनेत रोग होण्याआधी इतका कालावधी असावा अशी अट नाही तसेच कोणतेही आजार वगळण्यात आलेले नाहीत.<br>• या योजनेअंतर्गत ९७२ शस्त्रक्रिया/प्रक्रिया/उपचारपद्धती समाविष्ट आहेत. त्याचबरोबर ३० निर्धारित विशेष गटातील, १२१ फॉलोअप पॅकेजेसही अंतर्भूत आहेत. जसे की, कान, नाक, घसा यांची शस्त्रक्रिया, प्लॅस्टिक सर्जरी, भाजणे, संसर्गजन्य रोग, न्यूरॉलॉजी (मेंदूचे विकार), कार्डिऑलॉजी (हृदयरोग), गॅस्ट्रॉएन्ट्रॉलॉजी, अतिदक्ष सेवा इत्यादि. या योजनेअंतर्गत, एकमेकांशी संलग्न असलेली रुग्णालये, नियमित तपासणी, सल्ला मार्गदर्शन, रोगनिदान तसेच औषधे अशा सेवा, रुग्ण रुग्णालयातून घरी आल्यानंतर, १० दिवसांपर्यंत मोफत पुरवण्यात येतात. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी, ८ जिल्ह्यांत, जुलै २०१२ साली ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली. आजमितीला या आठ जिल्ह्यांतील ४९ लाख पात्र कुटुंबांना आर जी जे ए वाय योजनेखाली विमा संरक्षण देण्यात आले आहे. ही योजना कार्यान्वित असलेले आठ जिल्हे : गडचिरोली, अमरावती, नांदेड, सोलापूर, धुळे, रायगड, मुंबई आणि उपनगरे. आठ कोटी जनतेपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचवणे हेच या योजनेचे अंतिम उद्दिष्ट आहे. |
| **पात्रता :** | वार्षिक १ लाख रुपयांहून कमी उत्पन्न असलेली कुटुंबे या योजनेसाठी पात्र आहेत. व्यक्तिगत लाभ मिळण्यासाठी, ती व्यक्ती, पिवळी किंवा केशरी शिधापत्रिका धारक असणे गरजेचे आहे. |
| **अर्ज कसा करावा :** | दारिद्र्यरेषेखालील तसेच दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांना रोखरहित इलाजासाठी आरोग्यपत्रिका जारी केल्या जाव्यात याकरिता निर्धारित संलग्न रुग्णालयांनी स्वत:हून पुढाकार घ्यावा |
| **आवश्यक कागदपत्रे :** | वैध ओळख प्रमाणपत्र (पॅनकार्ड, शाळा/महाविद्यालयाचे ओळखपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे छायाचित्रासहित असलेले पासबुक, वाहनचालक परवाना, आधारकार्ड, पारपत्र, आरोग्यपत्रिका, स्वातंत्र्यसैनिक असल्याचा दाखला आणि इतर). सोबतच, नारिंगी (केशरी), पिवळे, अंत्योदय, अन्नपूर्णा अशा शिधापत्रिका |
| **शुल्क :** | लाभार्थीसाठी ही योजना अंशदानेतर आहे |
| **अतिरिक्त माहिती :** | * महाराष्ट्र शासनाने, ***राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना (आर एस बी वाय)*** या योजनेच्या जागी, जुलै २०१२ साली, ***राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना (आर जी जे डी ए वाय)*** अंमलात आणली. जुन्या योजनेअंतर्गत गरीबांना ३० हजार रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळत असे, तर, आर जी जे डी ए वाय योजनेअंतर्गत, दीड लाख रुपयांपर्यंतचे मोफत विमा संरक्षण पुरवण्यात येते. |

| १८. | **जननी सुरक्षा योजना आणि सुखीभव/सुखीबहू** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | प्रसूतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यू दरांचे तसेच नवजात अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय |
| **लाभ :** | ***जननी सुरक्षा योजना*** आणि ***सुखीभव*** ही प्रोत्साहनपर योजना यांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येते. (सुलभप्रसूती (सुविधाआधारित प्रसूती) होण्यात महाराष्ट्र राज्य सर्वात अग्रणी राहिले आहे. त्यामुळे ***जननी सुरक्षा योजनेअंतर्गत*** सुविधाआधारित प्रसुतीसाठी ग्रामीण भागात देण्यात येणारी प्रोत्साहनपर रोखराशी रु. ७०० इतकी असून शहरी भागात रु. ६०० इतकी दिली जाते.) ***जननी सुरक्षा योजना*** आणि ***सुखीभव*** योजना एकत्रित केल्यास, सुविधाआधारित प्रसूतीकरिता ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील गर्भवती महिलेला, रु. १००० एवढी प्रोत्साहनपर रोखराशी प्राप्त होते. (जननी सुरक्षा योजनेअंतर्गत रू. ७०० आणि ***सुखीभव*** योजनेअंतर्गत रु. ३००). मात्र अशी महिला दोन्ही योजनांतील सुधारित आणि एकत्रित निकषांस पात्र असावी. या रकमेचे वाटप प्रसूतीपूर्व अथवा दोन प्रसूतींदरम्यानच्या काळात करण्यात येते. ही प्रोत्साहनपर रक्कम फक्त ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील, केवळ सरकारी आरोग्यसंस्थांमधेच प्रसूती होणाऱ्या महिलेला देण्यात येते. जसे की, प्रशिक्षण देणारी रुग्णालये, जिल्हा रुग्णालयांचे मुख्यालय, विभागीय रुग्णालये, सामुदायिक आरोग्य केंद्रे, ३० खाटांची रुग्णालये, तसेच अन्य सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रे |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | सर्व पात्र महिलांना या योजनांचा लाभ मिळतो |
| **पात्रता :** | • दारिद्र्यरेषेखालील गर्भवती महिला<br>• महिलेचे वय १८ वर्षे असणे बंधनकारक आहे<br>• गर्भवती महिला अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील असल्यास<br>• फक्त दोन प्रसूतींसाठीच आर्थिक सहाय्य देण्यात येते. |
| **अर्ज कसा करावा :** | प्रसूतीची सोय असलेल्या सरकारी आरोग्य सुविधा केंद्रामार्फत |
| **आवश्यक कागदपत्रे :** | वयाचा दाखला<br>दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला<br>सरकारी सुविधा केंद्रात प्रसूती झाल्याचा दाखला |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही. |

| १९. | इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | प्रसूती झालेल्या महिलांना प्रसूती झाल्या झाल्या लगेचच तसेच पहिले सहा महिने बालकाला फक्त स्तनपान देण्यास प्रोत्साहित करणे<br>● गर्भावस्था, प्रसूती आणि स्तनपानादरम्यान घ्यावयाची काळजी, सेवा सुविधांचा वापर आणि स्तनपानाची योग्य पद्धत याबाबत जागृती करणे.<br>● प्रसूतीनंतर लगेचच स्तनपान देण्यासाठी आणि बालकाचे पोषण करण्यासाठी महिलांना प्रोत्साहित करणे. तसेच पहिल्या सहा महिन्यात फक्त स्तनपान देण्यासाठी महिलांना उत्तेजन देणे<br>● स्तन्य आणि गर्भवती मातांना सुधारित पोषण आणि चांगले आरोग्य मिळण्यासाठी प्रोत्साहनपर रोखराशी देणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | महिला आणि बालविकास मंत्रालय |
| **लाभ :** | प्रसूती आणि त्यानंतरचे बालसंगोपन या कालावधीत महिलांचे रोजगाराचे होणारे नुकसान भरून काढणे तसेच त्यांना उत्तम पोषण, स्तनपानाची योग्य पद्धत आणि सुरक्षित प्रसूती सुविधा उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. ही एक रोख हस्तांतरण योजना काही अटींवर आधारित आहे. स्तनपान देणाऱ्या तसेच १९ वर्षे वयाच्या गर्भवती महिला, तसेच २ अपत्ये असलेल्या महिलांनाच या योजनेअंतर्गत लाभ मिळतो. या योजनेच्या मिळणाऱ्या लाभाअंतर्गत, पहिल्या टप्प्यात, रोख रु. १५०० हस्तांतरित करण्यात येतात, दुसऱ्या टप्प्यात रोख रु. १५०० हस्तांतरित होतात आणि तिसऱ्या टप्प्यात रोख रु. १००० हस्तांतरित करण्यात येतात. मात्र त्याकरिता खालील अटींची पूर्तता केलेली असणे आवश्यक आहे :<br>**अटींची पूर्तता केल्यास मिळणारे फायदे :**<br>पहिल्या टप्प्यात हस्तांतरित करण्यात येणाऱ्या रोख रु. १५०० साठी (दुसऱ्या अपत्यप्राप्तीच्या वेळी/गर्भावस्थेच्या तिसऱ्या महिन्यात) मातेने पुढील बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे :<br>● गर्भावस्थेच्या पहिल्या ४ महिन्यांच्या आत जवळच्या अंगणवाडी केंद्रात नावनोंदणी करणे.<br>● प्रसूतीपूर्व घेण्याच्या काळजीसंदर्भातील आयोजित, किमान एका सत्रास उपस्थित राहणे तसेच टी टी आणि लोह व फॉलिक ॲसिडच्या गोळ्या घेणे<br>● आरोग्यसेवा केंद्रात अथवा अंगणवाडीत आयोजित करण्यात येणाऱ्या, समुपदेशनाच्या किमान १ ते ३ सत्रांना हजर असणे<br>दुसऱ्या टप्प्यात, प्रसूतीच्या तीन महिन्यांनंतर मातेला रोख रु. १५०० हस्तांतरित करण्यात येतात, त्याकरिता मातेने पुढील बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे :<br>● बालकाच्या जन्मनोंदणीचे प्रमाणपत्र<br>● बालकाचे ६ आणि १० आठवड्यांदरम्यान, दोन वेळा, बीसीजी आणि ओपीव्ही लसीकरण<br>● बालकाची देखभाल आणि त्याचे पोषण आणि प्रसूतीनंतर तिसऱ्या आणि सहाव्या महिन्यादरम्यान द्यावयाचा आहार यासंदर्भातील किमान २ सत्रांना हजर असणे<br>प्रसूतीनंतर ६ महिन्यांनी, रु. १००० चे तिसऱ्या टप्प्यातील हस्तांतरण करण्यात येते. त्यासाठी मातेने पुढील बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे :<br>● पहिले ६ महिने बालकाला फक्त स्तनपान देणे. त्यानंतर बालकाला प्रमाणित केलेला आहार देण्यास सुरुवात करणे<br>● बालकाचे डी पी टी आणि ओ पी व्ही लसीकरण<br>● अर्भक तसेच बालकाची वाढ होतानाची देखभाल या विषयावरील समुपदेशनाच्या किमान २ सत्रांना हजेरी |

| | |
|---|---|
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आलेल्या ५३ निवडक जिल्ह्यांतील पात्र महिलांना याचा लाभ होतो. २०११-१२ या वर्षात या योजनेचे २.०५ लाख लाभार्थी होते, तर २०१२-१३ या वर्षात ३.७६ लाख लाभार्थी होते.<br><br>महाराष्ट्रातून, या योजनेसाठी अमरावती आणि भंडारा या जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. |
| **पात्रता :** | देय स्वरूपातील प्रसूतीलाभ मिळणाऱ्या महिला वगळता, १९ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व गर्भवती महिला या योजनेसाठी लाभार्थी म्हणून पात्र आहेत. या योजनेअंतर्गत असणाऱ्या काही शर्तींच्या पूर्ततेनंतरच रोख हस्तांतरण करण्यात येते. |
| **अर्ज कसा करावा :** | वर उल्लेख केलेल्या अटींची पूर्तता करणे |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • वयाचा दाखला<br>• दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही. |

## ड. गृहनिर्माण आणि रोजगार योजना

| २०. | इंदिरा आवास योजना |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील नागरिक, बंधमुक्त कामगार तसेच ग्रामीण भागातील, दारिद्र्यरेषेखालील, तसेच बिगर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचे सदस्य नसलेल्या नागरिकांना घर बांधण्यासाठी अनुदान देणे. या योजनेसाठी, अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींची तसेच बिगर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींची यादी ग्राम पंचायतीमार्फत तयार केल्या जातात आणि त्याला ग्राम सभेकडून मंजूरी मिळणे आवश्यक आहे. |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र तसेच राज्य सरकार |
| **विभाग :** | ग्रामविकास मंत्रालय |
| **लाभ :** | इंदिरा आवास योजनेअंतर्गत माळरानावर बांधल्या जाणाऱ्या प्रत्येक घरामागे रु. ७०,००० अर्थसहाय्य देण्यात येते, तर डोंगराळ आणि उंचसखल प्रदेशातील बांधकामासाठी रु. ७५,००० अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच घरात सुधारणा करण्यासाठी रु. १५,००० चे अर्थसहाय्य देण्यात येते. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | निधी पुरवठा असा केला जातो : ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे, त्याच्या स्वरूपानुसार, घरबांधणीचा होणारा खर्च, ५०:५० या गुणोत्तरात, केंद्र आणि राज्य सरकारतर्फे देण्यात येतो. अन्य खर्च (बांधकाम सामुग्री), ७५:२५ या गुणोत्तरात केंद्र आणि राज्य सरकारतर्फे केला जातो.<br><br>राष्ट्रीय स्तरावर, या योजनेच्या खर्चाच्या एकूण निधीपैकी ६०% निधी अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच एकूण किंमतीच्या, बांधकामाच्या जागेची तजवीज, घरबांधणी, सुधारणा तसेच प्रशासकीय खर्चापोटी ९५% निधी राखून ठेवण्यात आला आहे. तर, काही विशेष प्रकल्पांसाठी ५% निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या विशेष प्रकल्पांमधे, नैसर्गिक आपत्ती अथवा हिंसाचारामुळे बाधित दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे, बंधीत कामगार (बंधुआ मजदूर), विमुक्त सफाई कामगार, विशेषकरून अरक्षित आदिवासी गट अथवा व्यावसायामुळे रोगग्रस्त झालेला जनसमूह अशांचे पुनर्वसन/ त्यांच्यासाठी नव्याने वसाहती स्थापन करणे याचाही समावेश होतो.<br><br>२०११ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांच्या घरबांधणीसाठी रु. १०० अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली होती. |
| **पात्रता :** | • अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती<br>• विमुक्त बंधीत कामगार<br>• दारिद्र्यरेषेखालील वर्गात मोडणारी, अल्पसंख्याक तसेच बिगर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील कुटुंबे<br>• लष्करी/निमलष्करी/पोलीस दलातील शहीदांच्या विधवा आणि निकटवर्तीय (दारिद्र्यरेषेखाली वर्गात असण्याची अट लागू नाही)<br>• माजी सैनिक<br>• अडचणीत असलेल्या महिला. यात, विधवा, घटस्फोटिता, एकाकी, अत्याचाराच्या बळी ठरलेल्या, ज्यांचा पती किमान तीन वर्षे बेपत्ता आहे तसेच कुटुंब चालवणाऱ्या महिलांचा समावेश होतो.<br>• मतिमंद व्यक्ती (अंपगत्वाचे प्रमाण किमान ४०% हवे)<br>• दिव्यांग व्यक्ती (अंपगत्वाचे प्रमाण किमान ४०% हवे)<br>• लिंगबदल केलेली व्यक्ती |
| **अर्ज कसा करावा :** | अधिक माहितीसाठी ग्राम पंचायतीशी संपर्क साधावा |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीतील असल्याचा दाखला (जात प्रमाणपत्र) |

| | |
|---|---|
| | • दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला<br>• ओळखपत्र |
| **शुल्क :** | सार्वजनिक अधिक्षेत्रासाठीच्या माहितीसाठी कोणतेही शुल्क नाही |
| **अतिरिक्त माहिती :** | • शौचालय वगळून, किमान २० चौरस मीटरचे बांधकाम झालेले नवीन घर<br>• घराला पक्के छत हवे. ‘पक्के’ याचा अर्थ हवामानानुसार, टिकून राहणारे हवे<br>• घराला शौचालय, भीजखड्डा, तसेच खत तयार करण्याचा (कंपोस्ट) खड्डा असणे अनिवार्य आहे. स्वयंपाकच्या गॅसची नोंदणी नसल्यास, घरात धूम्रविरहित चूल असणे बंधनकारक आहे.<br>• घराची सुधारणा, यात कच्च्या घराचे, वरील मानांकनांनुसार, पक्क्या घरात रूपांतर करणे अभिप्रेत आहे. |

| २१. | राजीव आवास योजना (आर ए वाय), राजीव ऋण योजना (आर आर वाय)* |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | मूलभूत सुविधा आणि अनुदानित कर्ज पुरवणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | गृहनिर्माण आणि नागरी गरीबी निर्मूलन मंत्रालय |
| **लाभ :** | • आर ए वाय : पाणीपुरवठा, मलनि:सारण, सांडपाणी व्यवस्था, अंतर्गत तसेच हमरस्ते, पदपथावरील दिवे पुरवणे तसेच 'एकात्म शहर' हा दृष्टिकोन ठेवत, झोपडपट्ट्यांतून तसेच अल्पउत्पन्न असणाऱ्या वसाहतींमधून सामाजिक पायाभूत सुविधा पुरवणे<br>• आर आर वाय : शहरी भागातील आर्थिकरित्या दुर्बल घटक (ई डब्ल्यू एस) तसेच अल्पउत्पन्न गटातील (एल आय जी) नागरिकांसाठी ५% अनुदानित व्याजदराने अनुदानित कर्ज<br>• आर आर वाय : आर्थिकरित्या दुर्बल घटकाकरिता (ई डब्ल्यू एस) गृहकर्जाची कमाल मर्यादा ५ लाख रुपये इतकी आहे तर अल्पउत्पन्न गटासाठी (एल आय जी) ८ लाख रुपये आहे.<br>• आर आर वाय : कर्जाचा कालावधी १५ वर्षे असेल तसेच तो २० वर्षांपेक्षा जास्त नसेल<br>• आर आर वाय : आर्थिकरित्या दुर्बल घटकाकरिता (ई डब्ल्यू एस), घराचा किमान आकार २१ चौरस मीटर आणि अल्पउत्पन्न गटासाठी (एल आय जी) २८ चौरस मीटर आहे.<br>• आर आर वाय : गृहनिर्माण आर्थिक संस्था आणि बँकांमार्फत कर्जवाटप करणे. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | आर्थिक मदत : २०११ साली, जेव्हा राजीव आवास योजना सुरू करण्यात आली, तेव्हा, या योजनेकरता १५० कोटी रुपये राष्ट्रीय निधी मंजूर करण्यात आला.<br>व्याप्ती : जे एन एन यु आर एम अंतर्गत येणारी सर्व शहरे, २००१ च्या जनगणनेनुसार ज्या शहरांची लोकसंख्या ३ लाखांहून अधिक आहे अशी शहरे, आणि अन्य छोटी शहरे<br>शहरी भागातील आर्थिकरित्या दुर्बल घटकासाठी (ई डब्ल्यू एस) आणि अल्पउत्पन्न गटासाठी (एल आय जी) असलेल्या सुधारित अनुदानित कर्ज योजनेचे नाव बदलून राजीव ऋण योजना असे नवीन नामकरण करण्यात आले. २०१३-२०१४ वर्षात, २.५ लाख घरे बांधण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट होते. |
| **पात्रता :** | • महिला, अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील नागरिक, तसेच अल्पसंख्याकांना प्राथमिकता<br>• ई डब्ल्यू एस किंवा एल आय जी प्रवर्गतील, अनुक्रमे २१ चौरस मीटर आणि २८ चौरस मीटर बांधकामासाठी कमाल ५ लाख रुपयांपर्यंत गृहकर्ज घेऊ इच्छिणारे नागरिक<br>• ई डब्ल्यू एस करिता, वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांहून कमी<br>• एल आय जी करिता, वार्षिक उत्पन्न १ लाख ते २ लाख रुपयांमधे |
| **अर्ज कसा करावा :** | प्रादेशिक कल्याण आयुक्ताकडे संपर्क साधावा |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • एल आय जी साठी, उत्पन्नाचा दाखला<br>• दारिद्र्यरेषेखाली असल्याचे कार्ड<br>• स्वयं प्रमाणित दाखले आणि प्रतिज्ञापत्रे<br>• उत्पन्न पात्रता प्रमाणपत्र<br>• ओळखपत्र |
| **शुल्क :** | कर्जाच्या रकमेच्या १% हमी शुल्क, फक्त एकदाच |
| **अतिरिक्त माहिती :** | * ताज्या माहितीनुसार, आर ए वाय आणि आर आर वाय योजना बंद करण्यात आल्या असून त्यांच्या निर्माण झालेल्या दायित्वासह, त्या, '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' अभियानात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.<br>(http://mhupa.gov.in/User_Panel?UserView.aspx?TypeID=1405) |

| २२. | **विडी कामगारांसाठी गृहनिर्माण अनुदान योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | विडी कामगारांमधे असलेली घरांची कमतरता काही प्रमाणात कमी करून त्यांना दिलासा देणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | श्रम आणि रोजगार मंत्रालय |
| **लाभ :** | • घरटी प्रत्येक कामगारासाठी एकसमान ४०,००० रुपयांचे अनुदान<br>• विडी कामगारांनी एकत्रितपणे घेतलेल्या जमिनीवर घर बांधता येऊ शकते/कुटुंबातील इतर सदस्यांसोबत पृथकपणे घेतलेल्या जमिनीवर अथवा कामगाराच्याच नावाने असलेल्या, राज्य शासनाने अथवा ग्राम सभेने दिलेल्या भूखंडावर<br>• जमिनीचे क्षेत्रफळ ६० चौरस यार्डांपेक्षा कमी असता कामा नये<br>• प्रत्येक गाळ्यासाठी (घरासाठी) येणारा किमान बांधकाम खर्च ४५,००० रुपये असेल. (रु. ४०,००० केन्द्र सरकारतर्फे मिळणारे अनुदान + रु. ५,००० कामगाराचे स्वत:चे योगदान). उर्वरित रक्कम एकतर कामगाराला स्वत:च उभी करावी लागेल अथवा हुडको सारख्या गृहकर्ज देणाऱ्या संस्थांमार्फत कर्जस्वरूपात उभारावी लागेल. अथवा मिळाल्यास, राज्य सरकारकडून अनुदान/कर्ज<br>• या योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या राहत्या घराची किंमत १ लाख रुपये ग्राह्य असेल |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | २०१० ते २०११ सालात, महाराष्ट्रात या योजनेवर एकूण १३५.०६ लाख रुपये खर्च करण्यात आले. २०११ ते २०१२ या वर्षात १५३.०६ लाख रुपये खर्च करण्यात आले.२०१२ ते २०१३ आणि २०१३ ते २०१४ या वर्षात, महाराष्ट्रात या योजनेसाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आली नव्हती. |
| **पात्रता :** | • कुटुंबात किमान एक विडी कामगार असणे<br>• कुटुंबाचे मासिक उत्पन्न ६,५०० रुपयांहून अधिक असता कामा नये |
| **अर्ज कसा करावा :** | गट गृहनिर्माण संस्थेने किंवा व्यक्तीने विहित नमुन्यातील अर्ज प्रादेशिक कल्याण आयुक्ताकडे सादर करणे अनिवार्य आहे. प्रादेशिक कल्याण आयुक्त पात्र विडी कामगार निश्चित करतील. त्यानंतर, त्यांचे अर्ज गोळा करून आणि त्यांची छाननी करून, विहित पडताळणी सूचीनुसार तपशील भरून, कामगार कल्याण महासंचालकांकडे अनुदान मिळण्याच्या प्रशासकीय मंजूरीसाठी पाठवतील. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • बांधण्यात येणारी घरे ही बहुमजली इमारत असेल वा स्वतंत्र घरे असतील याची माहिती<br>• एकूण किती घरे बांधण्यात येणार आहेत त्याची माहिती<br>• प्रत्येक घरासाठी येणारा अंदाजे खर्च<br>• सहकारी संस्थांच्या नोंदणीअधिकाऱ्याने जारी केलेल्या, प्रस्तावित जागेच्या सोसायटीच्या नोंदणीप्रमाणपत्राची नक्कलप्रत.<br>• जागेचा प्रारूप आराखडा (साईट प्लॅन)<br>• बांधण्यात येणाऱ्या घरांची विस्तृत रूपरेषा (ब्ल्यू प्रिंट)<br>• शहरी भागासाठी – आराखडा आणि उंची मंजुरीची महापालिका अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची नक्कलप्रत किंवा संस्थेच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षाने सादर केलेली, ग्राम सभेने प्रमाणित केलेली, संस्थेच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षाने खरी प्रत म्हणून प्रमाणित केलेली प्रत<br>• संस्था आर्थिक सुस्थितीत असल्याच्या दाखल्याची, स्थानिक जिल्हा सहकारी अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्राची नक्कलप्रत. ही प्रत संस्थेच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षाने खरी प्रत म्हणून प्रमाणित केलेली असावी<br>• संस्थेच्या नियामक मंडळाने, या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मागणाऱ्या ठरावाची प्रत. ही प्रत संस्थेच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षाने खरी प्रत म्हणून प्रमाणित केलेली असावी |

| | |
|---|---|
| | • या योजनेत नमूद करण्यात आलेल्या तरतुदींची पूर्तता करता न आल्यास, एकत्रितपणे किंवा व्यक्तिश:,  व्याजासहित अनुदानाची रक्कम परतफेड करण्याची, सर्व सदस्यांची स्वाक्षरी असलेले हमीपत्र. |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही |

| २३. | **संजय गांधी स्वावलंबन योजना** |
| --- | --- |
| **सयुक्तिकता :** | बेरोजगारांना आर्थिक सहाय्यता पुरवणे |
| **केन्द्र की राज्य :** | राज्य सरकार |
| **विभाग :** | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग |
| **लाभ :** | या योजनेअंतर्गत २,५०० रुपये किंमतीची दीर्घ मुदतीची कर्जे मंजूर करण्यात येतात. याची कर्जफेड दोन वर्षांच्या आत, ८ हप्त्यांत करावयाची असते. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | माहिती उपलब्ध नाही |
| **पात्रता :** | अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असावे तसेच त्याचा महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे अधिवास असावा |
| **अर्ज कसा करावा :** | तालुक्यातील तलाठ्यामार्फत |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • महाराष्ट्रात १५ वर्षे निवास असल्याचा दाखला<br>• जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय असल्यास)<br>• वयाचा दाखला<br>• २ पासपोर्ट आकाराचे फोटो<br>• स्थानिक खासदार/आमदार/जिल्हा परिषदेतील अधिकारी, सदस्य, नगर पालिका अधिकारी अथवा अर्जदाराला ओळखणाऱ्या व्यक्तीचे शिफारसपत्र |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही. |

| २४. | स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना* |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | कौशल्य विकास आणि स्वयंरोजगाराच्या प्रोत्साहनाच्या माध्यमातून तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या उपयुक्त सार्वजनिक मालमत्ता उभारून, शहरी भागातील बेरोजगार तसेच कमी रोजगार मिळणाऱ्यांची गरीबी दूर करणे |
| **केन्द्र की राज्य :** | केंद्र सरकारतर्फे ७५% अर्थसहाय्य देण्यात येते तर राज्यसरकारतर्फे २५% अर्थसहाय्य देण्यात येते |
| **विभाग :** | गृहनिर्माण आणि नागरी गरीबी निर्मुलन मंत्रालय |
| **लाभ :** | शहरी भागातील बेरोजगार तसेच कमी रोजगार मिळणाऱ्यांना स्वयंरोजगाराच्या योजना अथवा कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून लाभदायक सेवा पुरवण्यात येतात. तसेच पगारी रोजगार मिळण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करून घेतली जाते. त्यांना वैकल्पिक नोकरी देण्यात येते.<br>**नागरी स्वयं-रोजगार योजना (यु एस ई पी) :** या योजनेचे दोन घटक आहेत<br>● (कर्ज आणि अनुदान) : शहरी गरीब लाभार्थींना स्वयं रोजगारासाठी लाभदायक उद्यम सुरू करण्यासाठी सहाय्य करणे. मान्यताप्राप्त कमाल प्रकल्पखर्च २ लाख रुपये आहे तर मान्यताप्राप्त कमाल अनुदान प्रकल्पखर्चाच्या २५% इतके असून जास्तीत जास्त ५० हजार रुपयांपर्यंत आहे. याकरिता कोणतेही तारण आवश्यक नाही.<br>● (तंत्रज्ञान, विपणन आणि इतर सहाय्य) : शहरी भागातील गरीबांना, त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी तसेच त्याचे विपणन करण्यासाठी, तंत्रज्ञान/(विपणन) विक्री/पायाभूत सुविधा/ज्ञान संबंधित तसेच अन्य मदत पुरवणे. मायक्रो बिझनेस सेंटर अंतर्गत लघु उपक्रम सल्लागार सेवा (एस ई ए एस) पुरवण्यात येतात. यात पाच सेवांचा समावेश होतो. (१) समुदाय संचलन ज्यात सर्वेक्षण आणि लाभार्थी हुडकून काढणे, क्लस्टर डेव्हलपमेंट इत्यादिंचा समावेश होतो. (२) कौशल्य आणि उद्योजकता विकास समावेशक सक्षमीकरण (३) व्यवसाय विकास (४) अर्थ आणि कर्ज आणि (५) विक्री अर्थात् विपणन<br>**शहरी भागातील गरीबांसाठी, रोजगार प्रोत्साहनात्मक कौशल्य विकास प्रशिक्षण (स्टेप अप) :** शहरी भागातील गरीबांना, स्वयं रोजगारासाठी प्रोत्साहित करण्यासाठी तसेच चांगले वेतन मिळण्यास सक्षम बनवण्यासाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देणे.<br>● त्या त्या शहरातील/गावातील, लाभार्थींच्या एकूण संख्येनुसार, किमान ३०% महिला तसेच अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे.<br>● सरासरी प्रशिक्षण मूल्य, प्रति प्रशिक्षणार्थी १०,००० रुपयांहून अधिक होता कामा नये. यात सामुग्री, प्रशिक्षण साधने, प्रशिक्षकाचे मानधन, प्रशिक्षणार्थीला देण्यात येणारी छात्रवृत्ती इत्यादिंचा समावेश होतो.<br>**नागरी महिला स्वयं-सहायता कार्यक्रम (यु डब्ल्यू एस पी) : स्वयं सहाय्यता गट (एस एच जीस्)** : शहरी भागातील गरीब महिला उद्योजकांचे गट स्थापन करणे तसेच त्यांना बचत आणि कर्जासारख्या उपक्रमांसाठी फिरत्या निधीच्या माध्यमातून सहाय्य करणे.<br>● या अनुदान योजनेस पात्र होण्यासाठी, यु डब्ल्यू एस पी गटात किमान ५ नागरी गरीब महिला असणे बंधनकारक आहे.<br>● या योजनेअंतर्गत, गट उद्योग स्थापण्यासाठी, यु डब्ल्यू एस पी गटाला ३ लाख रुपयांपर्यंत अनुदान किंवा एकूण प्रकल्पखर्चाच्या ३५% किंवा गटातील प्रति सदस्यामागे ६०,००० रुपयांपर्यंत अनुदान या सर्वांतील जे काही कमी किंमतीचे असेल, तितके अनुदान मिळू शकते. उर्वरित रक्कम बँक कर्ज आणि तारण (बीज भांडवल) रक्कम म्हणून ठेवण्यात येईल.<br>● गट स्थापन झाल्यानंतर एक वर्षाने गटाला फिरता निधी उपलब्ध करून दिला जाईल. जरी, गट, यु डब्ल्यू एस पी अंतर्गत, कोणत्याही प्रकल्पात अथवा उद्योगात गुंतलेला नसला तरीही हा निधी देण्यात येईल. या निधीचा विनियोग मालाची खरेदी, पगारवाटप, प्रवासखर्च, बालसंगोपन, विपणन इत्यादिसाठी करता येईल. |

| | |
|---|---|
| | **शहरी मजूरी रोजगार कार्यक्रम (यु डब्ल्यु ई पी) :** ५ लाखांहून कमी लोकसंख्या असलेल्या गावात, तेथील गरीबांच्या श्रमाचा वापर करून, उपयुक्त सार्वजनिक मालमत्तेच्या बांधकामांची उभारणी करणे आणि त्याद्वारे त्यांना सहाय्य करणे.<br>• यु डब्ल्यू ई पी अंतर्गत खास करून अर्धकुशल आणि अकुशल कामगारांवर तसेच अकुशल रहिवासी/स्थलांतरितांवर लक्ष केंद्रित करण्यात येईल. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | २००९-२०१० यावर्षासाठी एस जे एस आर वाय अंतर्गत ५१५ कोटी रुपये इतकी केंद्रीय राशी देण्यात आली होती. |
| **पात्रता :** | शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे, विशेषत: अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील कुटुंबे, महिला आणि वेगळ्या पद्धतीने विकलांग असलेल्या व्यक्ती. शैक्षणिक पात्रतेची कोणतीही अट नाही. ज्यांना खरोखरच गरज आहे असे लाभार्थी हुडकण्यासाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणे, हे सर्वेक्षण झोपडपट्ट्यांमधून तसेच अल्पउत्पन्न वसाहतींमधून करावे अशी शिफारस करण्यात आली आहे. या संदर्भात एकात्मिक भूमिका विचारात घेण्यात येईल. |
| **अर्ज कसा करावा :** | स्थानिक प्रशासन आणि समुदाय व्यवस्थापनाकडून याबाबत माहिती उपलब्ध होऊ शकते. अर्ज आणि अधिक तपशील महापालिका कार्यालयात उपलब्ध आहे. |
| **आवश्यक कागदपत्रे :** | वयाचा दाखला आणि ओळखपत्र, जात प्रमाणपत्र, दारिद्र्यरेषेखाली असल्याचा पुरावा आणि संबंधित कार्यालयाकडून मागणी करण्यात येणारे इतर आवश्यक दस्तऐवज |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | *ही योजना आता राष्ट्रीय शहरी रोजगार अभियानाचा एक भाग आहे. |

| २५. | **स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना***  |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | **सदस्यांच्या मालकीचे, सदस्यांनीच नियंत्रित केलेले** आणि **सदस्यांचेच व्यवस्थापन असणाऱ्या** स्वयं सहायता गटाच्या माध्यमातून (एस एच जी) सामाजिक चळवळ निर्माण करणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील सूक्ष्मउद्योगजकांना संघटित करणे हे या योजनेचे लक्ष्य आहे. |
| **केन्द्र की राज्य :** | केंद्र सरकारतर्फे ७५% तर, राज्य शासनाकडून २५% अर्थसहाय्य देण्यात येते |
| **विभाग :** | ग्रामीण विकास मंत्रालय |
| **लाभ :** | ही एक प्रक्रियाधारित योजना आहे. ज्यात खालील प्रक्रिया समाविष्ट आहेत :<br>• गट स्थापना : ग्रामीण भागातील गरीबांना (दारिद्र्यरेषेखालील) सामाजिक संघटन, सक्षमीकरण आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयं सहायता गटांच्या रूपात संघटित करणे<br>• फिरता निधी उभारण्यासाठी आर्थिक तरतूद करणे. अशा रीतीने भांडवल निर्मितीच्या दिशेने वाटचाल.<br>• आर्थिक बाबी, जसे कर्ज आणि अनुदान उपलब्ध करून देणे, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि विपणन माध्यमातून सक्षमीकरण.<br><br>या एस एच जीं ना, स्वयंसेवी संस्था (एन जी ओ), समुदाय आधारित संस्था (सी बी ओ), बँका, तसेच एस एच जी ला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांमार्फत सहाय्य, व्यवस्थापन आणि प्रशिक्षण पुरवण्यात येते. सरकारी मालकीच्या जिल्हास्तरीय विकास संस्था (डी आर डी ए) आणि संबंधित राज्य शासनांकडूनही प्रशिक्षण आणि आर्थिक मदत देण्यात येते. भौगोलिक रचना तसेच सदस्यांच्या शारीरिक क्षमतेनुसार, एस एच जी सदस्यांची संख्या कमी-जास्त होऊ शकते.<br><br>एकूण प्रकल्प खर्चाच्या ३०% रक्कम, कमाल मर्यादा ७,५०० रुपये, अनुदान म्हणून दिली जाते. अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींसाठी हे अनुदान ५०% इतके असून कमाल मर्यादा १०,००० रुपये इतकी आहे. स्वयं सहायता गटांसाठी, ५०% अनुदान देण्यात येते. याची कमाल मर्यादा १.२५ लाख रुपये आहे. सिंचन प्रकल्पांकरिता कोणतीही आर्थिक मर्यादा घालण्यात आलेली नाही.<br><br>या योजनेतील एकूण लाभार्थींपैकी ५०% लाभार्थी अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील असून महिलांचे प्रमाण ४०% आहे तर दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण ३% आहे. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | या योजनेच्या आरंभापासून, २.२५ दशलक्ष स्वयं सहायता गटांची उभारणी झाली आहे. एकूण १४,४०३ कोटी रुपयांची (२.१ बिलियन अमेरिकी डॉलर) गुंतवणूक करण्यात आली असून, ६.६९७ दशलक्ष लोकांना त्याचा लाभ मिळत आहे. |
| **पात्रता :** | स्वयंसेवी संस्था, बँका आणि इतर सुविधा पुरविणाऱ्या संघटनांमार्फत, व्यक्ती (वैयक्तिक), प्राधान्याने अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील व्यक्ती, महिला आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील व्यक्ती निवडण्यात येतात. |
| **अर्ज कसा करावा :** | लागू होत नाही |
| **आवश्यक कागदपत्रे :** | सुविधा देणाऱ्या संघटनांमार्फत शिफारस करण्यात आलेली कागदपत्रे |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | *गरिबी निर्मुलन होण्यासाठी, तसेच ही योजना अधिक व्यापक, अधिक लक्ष्याधारित आणि कालकटिबद्ध करण्याच्या हेतूने, या योजनेचे नामांतरण राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अभियान असे करण्यात आले आहे. |

| २६. | **राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एन आर ई जी) (नरेगा)** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | ग्रामीण भागात अतिरिक्त रोजगार उपलब्ध करून देणे |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | ग्रामीण विकास मंत्रालय |
| **लाभ :** | • २५ ऑगस्ट, २००५ साली पारित झालेल्या, ७ सप्टेंबर २००६ साली अधिसूचित झालेल्या तसेच २ ऑक्टोबर २००९ साली, पुनर्नामकरण झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कायद्याचे (मनरेगा) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याअंतर्गत, ग्रामीण भागातील कोणाही, जे अकुशल बेरोजगार आहेत, आपल्या कुटुंबाची नोंदणी ग्रामपंचायतीत करू शकतात आणि तिथून नि:शुल्क असणारे, त्यांच्या छायाचित्रासहित असणारी कार्यपत्रिका (जॉब कार्ड) मिळवू शकतात.<br>• कार्यपत्रिका मिळाल्यानंतर, नोंदणीकृत ग्रामीण कुटुंब काम मिळण्यासाठी ग्रामपंचायतीत अर्ज करू शकते. अर्जदारांना, **अर्ज प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत** काम मिळवून देणे ग्रामपंचायतींना कायद्याने बंधनकारक आहे. तसे न झाल्यास, ग्रामीण कुटुंबाला बेरोजगार भत्ता द्यावा लागतो.<br>• या योजनेअंतर्गत, कार्यपत्रिकेच्या आधारे अर्जदाराला एका आर्थिक वर्षात किमान १४ ते १०० दिवसांचे काम मिळते.<br>• कुटुंबातील सर्व सज्ञान सदस्यांना (अकुशल कामगार) हा रोजगार निर्धारित किमान वेतन दराने मिळू शकतो. (सध्याचा स्वीकृत दर रु. १३० प्रतिदिन इतका आहे). पुरुष आणि महिलांना समान वेतनदर लागू असतो. वेतन साप्ताहिक कालावधी स्वरूपात देणे बंधनकारक आहेत तसेच पंधरा दिवसांपेक्षा जास्त उशीर होता कामा नये<br>• रोजगाराच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, कुटुंबातील बालकांकरिता पाळणाघर तसेच विश्रांतीसाठी सावलीची जागा इत्यादि सुविधा असणे बंधनकारक आहे. रोजगाराची जागा गावापासून ५ कि. मी. च्या परिघात असावी. वाहतूक, येण्या-जाण्याच्या तसेच गावाबाहेर राहताना येण्याच्या खर्चाला समाविष्ट करून घेण्यासाठी वेतनदर १०% जास्त असावा.<br>• या योजनेत नमूद केलेल्या आदेशांनुसार, एकूण लाभर्थींपैकी १/३ लाभार्थी महिला असाव्यात.<br>• तक्रारण निवारण यंत्रणा अस्तित्वात असावी तसेच प्रत्येक तक्रारीची योग्य ती छाननी होणे आवश्यक आहे. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | अकुशल कामगारांसाठीचे १००% वेतन तसेच सामुग्री खर्चाच्या ७५% रक्कम केन्द्र सरकारकडून पुरवण्यात येते. सामुग्री खर्चात बांधकाम खर्च, तज्ज्ञांचे वेतन आणि उप-तज्ज्ञ कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा समावेश होतो. ग्राम सभा चालू असणाऱ्या कामांचे सामाजिक लेखापरीक्षण करते. जर तो ग्रामप्रकल्प असेल तर त्याकरिता जिल्हा पंचायत आणि ग्राम सभेची परवानगी आवश्यक असते. ग्राह्य कामांमध्ये पाणी आणि जमीन संरक्षण, वनीकरण तत्सम उपक्रमांचा समावेश होतो. २००६ ते २००७ दरम्यान, २.१० कोटी लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला, २००७ ते २००८ दरम्यान, ३.३९ कोटी लोकांना, २००८ ते २००९ दरम्यान ४.५१ कोटी लोकांना, २००९ ते २०१० दरम्यान ५.२६ कोटी लोकांना मनरेगा अंतर्गत रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. २०१० ते २०११ दरम्यान रोजगार पुरवण्यात आल्याची नैमित्तिक आकडेवारी ५.० कोटी इतकी आहे. |
| **पात्रता :** | ग्रामीण कुटुंबातील सज्ञान सदस्य, जे अकुशल स्वरूपाचे काम करू इच्छितात. |
| **अर्ज कसा करावा :** | ग्रामीण कुटुंबातील सज्ञान सदस्य, जे अकुशल स्वरूपाचे काम करू इच्छितात त्यांनी नोंदणी करणे आवश्यक |
| **आवश्यक कागदपत्रे :** | ओळखपत्र आणि वयाचा दाखला |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही |

## इ. शेतकऱ्यांशी संबंधित योजना आणि अन्य योजना

| २७. | **कृषी संजीवनी योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | शेतकऱ्यांवरील वीजबिलाचा बोजा कमी करून, थकित रकमेपैकी काही रक्कम वीजमंडळाला मिळावी या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळून त्याचा राज्यशासनालाही फायदा मिळतो. थकीत रकमेमुळे होणाऱ्या नुकसानीतून शेतकरी तसेच वीजमंडळ दोघांनाही वाचता येते. |
| **केन्द्र की राज्य :** | राज्य सरकार |
| **विभाग :** | कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग |
| **लाभ :** | • या योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून, मूळ थकित वीजदेयकापैकी ५०% माफ करण्यात येतात. मात्र उर्वरित ५०% रकमेचा भरणा करण्यात येईल या अटीवरच ही माफी देण्यात येते.<br>• त्याव्यतिरिक्त, थकित वीजदेयकावरील व्याज ही वीजमंडळाकडून माफ करण्यात येते.<br>• माफीनंतरची उर्वरित ५०% रक्कम जे शेतकरी भरू शकत नाही त्यांना पूर्ण थकीत रक्कम आणि दंड भरावा लागतो. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | महावितरणच्या ४०.३० लाख ग्राहकांपैकी, ३४ लाख थकबाकीदार आहेत. या थकबाकीची एकूण किंमत ६,१४० कोटी इतकी होते. यापैकी राज्य सरकारने ३,०७० कोटी रुपये भरण्याची हमी घेतली आहे (एकूण थकबाकीच्या ५०%). मार्च २०१५ पर्यंत, अंदाजे ६.६७ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. सरकारने या योजनेला मार्च २०१६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. |
| **पात्रता :** | सर्व शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत. |
| **अर्ज कसा करावा :** | वीजमंडळाकडे थकित असलेल्या देय रकमेचा भरणा करून |
| **आवश्यक कागदपत्रे :** | लागू नाही |
| **शुल्क :** | लागू नाही |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही |

| २८. | **गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | राज्यातील सर्व शेतकऱ्यांना मोफत विमा संरक्षण देणे |
| **केन्द्र की राज्य :** | राज्य सरकार |
| **विभाग :** | कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग |
| **लाभ :** | • २०१५ ते २१०६ या कालावधीकरिता, शेतकऱ्यांना मोफत विमा संरक्षण देणारी ही योजना आहे.<br>• या योजनेअंतर्गत राज्यातील सर्व १.३७ कोटी शेतकऱ्यांना, २ लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण देण्यात येईल. विम्याचे हप्ते सरकार भरणार असल्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याही स्वरूपात खर्च उचलावा लागणार नाही.<br>• एक विशिष्ट कालात, विमाधारक शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास, त्याच्या वारसाला किंवा निकटवर्तियाला २ लाख रुपये दिले जातात. अपघाती मृत्यू या सदरात, शेतावरील अपघात, वीजधक्क्यामुळे अपघात, जंगली जनावराकडून झालेला हल्ला, बुडून मृत्यू किंवा रस्ता तसेच रेल्वे प्रवासादरम्यान अपघाती मृत्यू इत्यादि मोडतात.<br>• दोन्ही डोळे, एखादा अवयव किंवा एक डोळा आणि शरीराचा महत्त्वाचा अवयव निकामी झाल्यास पूर्ण रक्कम दिली जाते.<br>• डोळ्याचे किंवा एखाद्या अवयवाचे थोडेसे नुकसान झाल्यास, शेतकऱ्याला १ लाख विमाराशी प्राप्त होते. उंचावरून पडल्यामुळे, आगीमुळे, नक्षलवादी हल्ल्यांमुळे, खून, दंगल अशा प्रकारणामुळे होणारे अपघात विमा संरक्षणासाठी ग्राह्य धरण्यात येत नाहीत.<br>• पॉलिसी घेतल्यापासून एक वर्षांपर्यंत ही योजना लागू असते. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | राज्यातील सर्व १.३७ कोटी शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत विमा संरक्षण देण्यात आले आहे. विम्याच्या एकूण हप्त्यापोटी राज्य सरकारला २७.२५ कोटी रुपये खर्च येतो. |
| **पात्रता :** | ज्यांचे नाव जमिनींच्या नोंदपत्रात आहे असे, ७५ वर्षे वयाच्या आतील सर्व शेतकरी |
| **अर्ज कसा करावा :** | सात बाराचा उतारा तसेच वारसदारांच्या यादीसह संबंधित विभागाशी संपर्क साधावा |
| **आवश्यक कागदपत्रे :** | वारसदाराची नाव नोंदणी झालेला ७/१२ उतारा |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही |

| २९. | प्रधानमंत्री पीक विमा योजना (नव्याने सुरू करण्यात आली आहे) |
|---|---|
| सयुक्तिकता : | पूर, दुष्काळ, गारपीट आणि इतर नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होते. या निर्धनतेपासून शेतकऱ्याला विमासंरक्षण देणे. |
| केन्द्र की राज्य : | केन्द्र आणि राज्य सरकार |
| विभाग : | कृषी, सहकार, आणि शेतकरी कल्याण. तसेच विविध आर्थिक संस्था आणि एजन्सीज जसे फलोत्पादन आकडेवारी, पंचायत, महसूल, माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान इ. विभागांच्या सहकार्याने ही योजना राबवण्यात येते. |
| लाभ : | • प्रधानमंत्री पीक विमा योजना येत्या खरीप (पावसाळी) हंगामापासून राबवण्यात येणार आहे. खरीप पिकांसाठी विमाहप्ता केवळ २% आहे तर रबी (हिवाळी) पिकांसाठी केवळ १.५% आहे. हेच दर तेलबियांना देखील लागू आहेत. व्यावसायिक पिके आणि फलोत्पादन यांसाठी दर ५% आहे.<br>• खरीप आणि रबी पिकांसाठी असणाऱ्या अनुक्रमे २% आणि १.५% दरांपलीकडचा विम्याचा शेष हप्ता केन्द्र आणि राज्य सरकारतर्फे ५०:५० या गुणोत्तरात भरण्यात येतो.<br>• याआधीच्या पीक विमा योजनांअंतर्गत, लागवडीखालील २३% पिकालाच विमासंक्षण मिळत असे, परंतु ५०% पिकाला तीन वर्षांत विमा संरक्षण देण्याचे नव्या योजनेचे उद्दिष्ट आहे.<br>• सरकारी अनुदानावर कोणतीही कमाल मर्यादा ठेवण्यात आली नसून, जरी विमाहप्त्याची शेष राशी ९०% असेल तरीही ती सरकारतर्फे भरण्यात येईल.<br>• यापूर्वी, विमाहप्त्याचा सरकारी तिजोरीवर पडणारा भार कमी व्हावा याकरिता हप्त्याच्या दरावर मर्यादा घालण्यात आली होती. ही मर्यादा आता काढून टाकण्यात आली असून कोणतीही वजावट न होता शेतकरी पूर्ण विमाराशीवर दावा करू शकतात.<br>• तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास उत्तेजन देण्यात येईल. पिकाची महिती अपलोड करण्यासाठी स्मार्ट फोनचा वापर करण्यात येणार आहे, जेणेकरून शेतकऱ्याला विनाविलंब विमाराशी प्राप्त होऊ शकेल. पीक कापणीचे प्रयोग कमी करण्यासाठी रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञान वापरण्यात येईल.<br>• या नव्या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांची बऱ्याच दिवसापासून असलेली मागणी पूर्ण करण्यात येइल. गारपीट, बिगरमोसमी पाऊस, भूस्खलन, जलप्रलय अशासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीचे शेतपातळी मूल्यांकन करण्यात येईल.<br>• नैसर्गिक आपत्ती आणि कीटक किंवा किडींपासून होणारे नुकसानही या विमा संरक्षणयोजनेत अंतर्भूत आहे. |
| व्याप्ती आणि आर्थिक मदत: | राष्टीय कृषी विमा योजनेच्या (एन ए आय एस) आणि सुधारित राष्ट्रीय विमा योजना (एम एन ए आय एस) या योजनेच्या ऐवजी, प्रधानमंत्री फसल बीमा योजना राबवण्यात येत आहे. आधीच्या दोन योजनांमधील काही अंगभूत त्रुटींमुळे शेतकरी या योजनांकडे फारसा वळला नाही. या त्रुटींमधे विम्याचा चढा दरही समाविष्ट आहे. सध्याच्या २३% पीक संरक्षणाअंतर्गत विम्यापोटी सरकारवर ३,१०० कोटी रुपयांचा बोजा येतो. जेव्हा पुढे जाऊन हे पीक संरक्षण ३०% करण्यात येईल तेव्हा हा बोजा ५,७०० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. पुढे जाऊन ५०% पीक संरक्षण करण्यात आल्यानंतर हा बोजा ८,८०० कोटी रुपयांपर्यंत वाढणार आहे. |
| पात्रता : | भाडेकरू, खंडकरी आणि एस ए ओ शेतकरी |
| अर्ज कसा करावा : | अधिक माहिती प्रतिक्षित आहे |
| आवश्यक कागदपत्रे : | अधिक माहिती प्रतिक्षित आहे |
| शुल्क : | खरपी आणि रबी पिकांसाठी अनुक्रमे २% आणि १.५% विमाहप्ता |
| अतिरिक्त माहिती : | सरकारने आणखी एका नव्या योजनेची, एकीकृत विमा योजनेची घोषणा केली आहे. (यू पी आय एस) ज्यात शेतकऱ्यांना, अनेक पिके, बांधकाम, पाण्याचा पंप, ट्रॅक्टर, अपघात, मृत्यू, आरोग्य आणि विद्यार्थी सुरक्षा याकरिता विमा संरक्षण देण्यात येईल. ही योजना एकाच वेळी ४५ जिल्ह्यांत राबवण्यात येणार आहे. |

| ३०. | **प्रधानमंत्री जन धन योजना** |
|---|---|
| **सयुक्तिकता :** | नागरिकांची आर्थिक समावेशकता वाढवण्यासाठी, कारण, गरीबी कमी करण्यात हा देखील एक महत्त्वाचा घटक आहे. समाजातील एक मोठा हिस्सा आर्थिक सेवांपासून दूर राहिल्यास ते देशाच्या प्रगतीला बाधक ठरते. वृद्धी आणि विकासाची गोड फळे चाखण्यासाठी, नागरिकांचे आर्थिक सक्षमीकरण करणे अतिशय गरजेचे होते. |
| **केन्द्र की राज्य :** | केन्द्र सरकार |
| **विभाग :** | आर्थिक सेवा विभाग, अर्थ मंत्रालय |
| **लाभ :** | • शून्य बचतशिल्लक असलेले बँक खातेही ग्राह्य धरण्यात येते. नागरिकांना आर्थिक सेवा, जशा की, बँकिंग/बचत आणि ठेव अकाऊंट, पैसे भरणे, कर्ज, विमा, निवृत्तीवेतन अशा सेवा वाजवी आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होऊन त्यांचे आर्थिक समावेशन वाढते.<br>• चेक बुक सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी. याकरिता देखील खात्यात अमूक एक रक्कमच शिल्लक असली पाहिजे असा कुठलाही निर्बंध नाही.<br>• रोख रक्कम काढण्यासाठी रुपे डेबीट कार्ड जारी करण्यात येते.<br>• या योजनेअंतर्गत जी व्यक्ती आपले पहिले बचत खाते उघडते, त्या व्यक्तीला ३०,००० रुपयापर्यंतचे विमा संरक्षण देण्यात येते, तर १ लाख रुपयांपर्यंतचे अपघाती विमा संरक्षण देण्यात येते.<br>• बँक खाते सक्रिय ठेवल्यास तसेच, केलेली बचत नियमितपणे खात्यात जमा केल्यास, खातेदाराला ५ हजार रुपयांपर्यंतचा ओव्हरड्राफ्ट (खात्यात शिल्लक असलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम काढता येते) देण्यात येतो. |
| **व्याप्ती आणि आर्थिक मदत:** | आजमितीस एकाही बँकेत खाते नसलेला सज्ञान भारतीय नागरिक |
| **पात्रता :** | देशातील सर्व नागरिकांसाठी ही योजना खुली आहे. विशेषत: आजमितीस एकही बँक खाते नसलेल्यांसाठी |
| **अर्ज कसा करावा :** | कोणत्याही बँकेच्या शाखेत अथवा बँक मित्र मधे खाते उघडता येते |
| **आवश्यक कागदपत्रे :** | • जर आधार कार्ड/आधार नंबर असेल तर कोणतेही अन्य दस्तऐवज लागत नाहीत. तर पत्ता बदलला असेल, तर स्वप्रमाणित नवीन पत्त्याची प्रत पुरेशी आहे.<br>• जर आधार कार्ड नसेल, तर पुढीलपैकी कोणतेही एक अधिकृत वैध दस्तऐवज म्हणून गणला जातो. : मतदार ओळखपत्र, वाहनचालक परवाना (ड्राईव्हिंग लायसेन्स), पॅनकार्ड, पासपोर्ट आणि नरेगा कार्ड. जर या कागदपत्रांवर तुमचा राहता पत्ता नमूद झाला असेल तर ते, ओळखपत्र तसेच रहिवासी पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येते.<br>• जर एखाद्या व्यक्तीकडे वर नमूद केल्यापैकी एकही 'अधिकृत वैध दस्तऐवज' नसेल, आणि तरीही बँकेने त्या व्यक्तीचे खाते उघडण्यात धोका नाही असा शेरा मारला असेल तर तो/ती खालीलपैकी एक दस्त सादर करून बँक खाते उघडू शकते. :<br>• केन्द्र/राज्य सरकारी विभागाकडून, वैधानिक/नियामक अधिकाऱ्यांकडून, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, शेड्यूल्ड कमर्शियल बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातील आर्थिक संस्था यापैकी कोणाकडूनही जारी करण्यात आलेले अर्जदाराचे छायाचित्रासहित असलेले ओळखपत्र.<br>• राजपत्रित अधिकाऱ्याने जारी केलेले, अधिकृतपणे साक्षांकित केलेले, अर्जदाराच्या छायाचित्रासहित असलेले पत्र |
| **शुल्क :** | नि:शुल्क |
| **अतिरिक्त माहिती :** | लागू होत नाही. |

# स्रोत

## साधारण (General)

http://pib.nic.in/newiste/PrintRelease.aspx?relid=116152

## अन्नसुरक्षा आणि पोषणयोजना

**शिधापत्रिकेचे विविध प्रकार**

http://akola.nic.in/Collectorate/Food%20Civil%20Supplies.htm

http://www.karmayog.org/govtactsschemes/govtactsschemes_2363.htm

http://www.sccommissioners.org/FoodSchemes/TPDS.html

https://en.wikipedia.org/wiki/Ration_card_%28India%29

**दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिका (पिवळी)**

http://mahafood.gov.in/website/english/PDS.aspx

http://rationcards.in/mahaonline-gov-in-how-to-apply-ration-card-in-maharashtra-renewal-addition/

**दारिद्र्यरेषेवरील शिधापत्रिका (नारिंगी/केशरी)**

http://mahafood.gov.in/website/english/PDS.aspx

http://rationcards.in/mahaonline-gov-in-how-to-apply-ration-card-in-maharashtra-renewal-addition/

**अंत्योदय अन्न योजना**

http://mahafood.gov.in/website/english/PDS.aspx

http://dfpd.nic.in/?q=node/999

**अन्नपूर्णा**

http://mahafood.gov.in/website/english/PDS2.aspx

http://maharashtra.gov.in/english/food/schemesAnna.php

http://india.gov.in/govt/viewscheme.php?schemeid=426

**एकात्मिक बालविकास सेवा (ICDS) दुहेरी पोषण**

http://wcd.nic.in/schemes/integrated-child-development-servicesicds

## निवृत्तीवेतन आणि सामाजिक सुरक्षा योजना

**राष्ट्रीय समाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP)**

http://www.sgynashik.com/~nsapnash/sgynew/

**इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना**

https://www.sjsa.maharashtra.gov.in/en/schemes-page?scheme_nature=37

http://mumbaisuburban.gov.in/html/sanjay_gandhi_yojna.htm

**संजय गांधी निराधार अनुदान योजना**

https://www.sjsa.maharashtra.gov.in/en/schemes-page?scheme_nature=37

http://www.karmayog.org/Seniorcitizens/Seniorcitizens_12580.htm

http://pune.nic.in/punecollectorate/districtadmin/GovtYojanas.apsx

http://dhule.nic.in/html/SGY_IGY_branch.htm

http://mumbaisuburban.gov.in/html/sanjay_gandhi_yojna.htm

**इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांगत्व निवृत्तीवेतन योजना किंवा इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंगत्व निवृत्तीवेतन योजना**

http://rural.nic.in/sites/downloads/our-schemes-glance/SalientFeaturesNSAP.pdf

https://www.sjsa.maharashtra.gov.in/en/schemes-page?scheme_nature=37

http://mumbaisuburban.gov.in/html/sanjay_gandhi_yojna.htm

**श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना**

https://www.sjsa.maharashtra.gov.in/en/schemes-page?scheme_nature=37

http://mumbaisuburban.gov.in/html/sanjay_gandhi_yojna.htm

**राष्ट्रीय कुटुंब अर्थ सहाय्य योजना**

http://india.gov.in/govt/viewscheme.php?schemeid=112

http://mumbaisuburban.gov.in/html/sanjay_gandhi_yojna.htm

**इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था निवृत्तीवेतन योजना**

http://www.karmayog.org/Seniorcitizens/Seniorcitizens_12580.htm

http://mumbaisuburban.gov.in/html/sanjay_gandhi_yojna.htm

**आम आदमी विमा योजना**

https://www.sjsa.maharashtra.gov.in/en/schemes-page?scheme_nature=37

http://pib.nic.in/newsite/PrintRelease.aspx?relid=124604

http://www.licindia.in/aam_admi_features.htm

https://aaby.mahaonline.gov.in/FORMS/TotalEnrollmentReports.aspx

**इंदिरा गांधी निराधार भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान योजना**

http://www.karmayog.org/Seniorcitizens/Seniorcitizens_12580.htm

http://dhule.nic.in/html/SGY_IGY_branch.htm

http://dhule.nic.in/html/SGY_IGY_branch1.htm

http://parbhani.nic.in/htmldocs/GOMSchemes.html

**प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना**

http://pib.nic.in/newsite/PrintRelease.aspx?relid=116207

**प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना**

**कामगार राज्य विमा योजना**

https://en.wikipedia.org/wiki/Employees'_State_Insurance

http://www.esic.nic.in/Tender/ESIAct1948Amendedupto010610.pdf

http://esic.nic.in/benefits.php

http://www.esic.nic.in/coverage.php

http://www.esicmaharashtra.gov.in/htmldocs/esic_coverage.htm

**प्रसूती लाभासह आरोग्य योजना :**

http://www.archive.india.gov.in/citizen/health/health.php?id=61

http://www.epw.in/commentary/too-little-too-late.html

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना**

http://www.moneylife.in/article/rajiv-gandhi-jeevandayee-arogya-yojana-what-you-need-to-know/30348.html

https://www.jeevandayee.gov.in/

https://www.jeevandayee.gov.in/RGJAY/RGJAYDocuments/IDPROOFLIST.pdf

https://www.jeevandayee.gov.in/RGJAY/empanelment/Eligibility.jsp

https://www.jeevandayee.gov.in/RGJAY/FrontServlet?requestType=CommonRH&actionVal=RightFrame&page=undefined%3E%3E%3Cb%3ERGJAY%3C/b%3E&pageName=RGJAY&mainMenu=About&subMenu=RGJAY

**जननी सुरक्षा योजना आणि सुखीभव/सुखीबहू**

http://www.indianyojana.com/yojana-for-girls/janani-suraksha-yojana.htm

http://india.gov.in/citizen/health/viewscheme.php?schemeid=1804

**राष्ट्रीय प्रसूती लाभ योजना** (NMBS)

http://planningcommission.nic.in/reports/sereport/ser/maker/mak_cht5c.pdf

http://www.sccommissioners.org/FoodSchemes/NMBS.html

**( एन एम बी एस ही योजना पुढे २००५ मध्ये सुधारण्यात आली आणि तिचे जननी सुरक्षा योजना असे नामांतर करण्यात आले** (JSY)**)**

**राष्ट्रीय प्रसूती लाभ योजना (NMBS):**

http://www.sccommissioners.org/FoodSchemes/NMBS.html

**इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना**

http://www.indianyojana.com/yojana-for-girls/the-indira-gandhi-matritva-sahayog-yojana.htm

http://wcd.nic.in/schemes/indira-gandhi-matritva-sahayog-yojana-igmsy-conditional-maternity-benefit-scheme

http://wcd.nic.in/sites/default/files/IGMSYImpGuidelinesApr11.pdf

## गृहनिर्माण आणि रोजगार योजना

**विडी कामगारांसाठी अनुदान गृहनिर्माण**

http://www.kar.nic.in/labour/beedi/%20subsidy--central.doc

http://labour.nic.in/content/dglw/schemes/REVISEDINTEGRATEDHOUSINGSCHEME.html

http://labour.nic.in/upload/uploadfiles/files/Budget/Ch-4B%282%29.pdf

http://labour.nic.in/upload/uploadfiles/files/Divisions/Parliament/LS%20SQ%2058%20.pdf

**राजीव गांधी आवास योजना**

http://mhupa.gov.in/User_Panel/UserView.aspx?TypeID=1282

http://www.gktoday.in/rajiv-awas-yojana_06

http://www.moneylife.in/article/government-launches-rajiv-awas-yojana-to-house-urban-poor-centre-to-fund-rs50000-per-unit/18621.html

http://www.deccanherald.com/content/6233/rajiv-awas-yojana-urban-poor.html

http://www.nhb.org.in/Whats_new/Rajiv-Rinn-Yojana-%28RRY%29-and-Credit-Guarantee-Fund-Trust-for-Low-Income-Housing-%28CGFTLIH%29.pdf

**इंदिरा आवास योजना**

http://iay.nic.in/netiay/more_benefcry.htm

http://economictimes.indiatimes.com/articleshow/50359917.cms?utm_source=contentofinterest&utm_medium=text&utm_campaign=cppst

https://en.wikipedia.org/wiki/Indira_Awas_Yojana

http://www.60plus.co.in/national-policy.html

http://www.thebetterindia.com/23721/woman-landless-and-homeless-benefit-from-government-schemes/

http://iay.nic.in/netiay//IAY%20revised%20guidelines%20july%202013.pdf

http://pib.nic.in/newsite/efeatures.aspx?relid=86168

**संजय गांधी स्वावलंबन योजना**

http://www.nashik.nic.in/divisionalcommissioner/htmldocs/sanjay.html

http://amravati.nic.in/htmldocs/SGY.html

http://maharashtracivilservice.org/feedfiles/51dcd364d6856.pdf

**स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

http://www.gktoday.in/swaran-jayanti-shahari-rozgar-yojna_29/

http://india.gov.in/govt/viewscheme.php?schemeid=1745

http://india.gov.in/swarna-jayanti-shahari-rozgar-yojana

https://en.wikipedia.org/wiki/Swarna_Jayanti_Shahari_Rozgar_Yojana

http://www.indianyojana.com/rojgar-yojana/swarna-jayanti-shahari-rozgar-yojana.htm

http://urban.bih.nic.in/docs/sisry-guidelines.pdf

http://vikaspedia.in/social-welfare/urban-poverty-alleviation-1/schemes-urban-poverty-alleviation/swarna-jayanti-shahari-rozgar-yojana

**स्वर्ण जयंती ग्रामीण स्वरोजगार योजना**

http://rural.nic.in/sites/downloads/our-schemes-glance/SalientFeaturesSGSY.pdf

http://rural.nic.in/sites/programmes-schemes-sgsy.asp

http://www.indianyojana.com/rojgar-yojana/swarnajayanti-gram-swarozgar-yojana.htm

https://en.wikipedia.org/wiki/Swarnajayanti_Gram_Swarozgar_Yojana

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना** (NREGS)

http://rural.nic.in/sites/MGNREGA.asp

http://www.indianyojana.com/rojgar-yojana/nrega-national-rural-employment-guarantee-act.htm

http://rural.nic.in/sites/downloads/right-informationact/02%20_CIC_PartII_MG_NREGA%28F%29.pdf

http://www.nrega.nic.in/netnrega/home.aspx

## शेतकरी विषयक योजना आणि इतर योजना

**कृषी संजीवनी योजना शेतकऱ्यांना थकित वीज देयक भरण्यात माफी**

http://www.nsap.nic.in/guidelines.html

http://www.pradhanmantriyojana.co.in/krishi-sanjeevani-amnesty-drought-hit-farmers/

http://timesofindia.indiatimes.com/city/mumbai/Maharashtra-govt-extends-Krishi-Sanjeevani-Yojana/articleshow/49598096.cms

**गोपिनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**

http://timesofindia.indiatimes.com/city/nagpur/Free-accident-cover-for-farmers-in-state/articleshow/49913717.cms

http://agricoop.nic.in

http://www.jagranjosh.com/current-affairs/maharashtra-government-to-launch-gopinath-munde-farmers-accident-insurance-scheme-1448421793-1

**प्रधानमंत्री पीक विमा योजना**

http://agricoop.nic.in/imagedefault/whatsnew/sch_eng.pdf

http://indianexpress.com/article/business/business-others/pradhan-mantri-fasal-bima-yojana-crop-insurance-plan-to-entail-rs-8-8k-cr-outgo/

http://pmjandhanyojana.co.in/pradhan-mantri-fasal-bima-crop-insurance-scheme/

**प्रधानमंत्री जन धन योजना**

http://www.pmjdy.gov.in/home

http://jandhanyojana.net

https://india.gov.in/spotlight/pradhan-mantri-jan-dhan-yojana-pmjdy#tab=tab-1

https://3n.wikipedia.org/wiki/Pradhan_Mantri_Jan_Dhan_Yojana

आय.एल.ओ.दक्षिण आशिया उत्कृष्ट काम टिम आणि भारत देश कार्यालय
कोअर ४ बी, तिसरा मजला,
इंडिया हॅबीटॅट सेंटर,
लोधी रोड,
नवी दिल्ली–११०००३
भारत.

फोन: +९१ ११ २४६०२१०१–०७
ई–मेल: delhi@ilo.org